बी.एम. प्रतिष्ठान
बी. एम. प्रतिष्ठान महाराष्ट्र राज्य
संस्थापक अध्यक्ष बाळासाहेब भगवानराव मस्के

दैनिक बीड
# पुण्यभूमी
संपादक:बाळासाहेब मस्के

बी.एम. प्रतिष्ठान
बी. एम. प्रतिष्ठान महाराष्ट्र राज्य
संस्थापक अध्यक्ष बाळासाहेब भगवानराव मस्के

बीड | मंगळवार,दि.१० डिसेंबर २०२४ | वर्ष४रे | अंक१२४वा | पाने ६ | दररोजच्या घडामोडीसाठी वाचत रहा... पुण्यभूमी | https://Paper.epunyabhumi.in | RNI No : MAHAMAR/2021/81902 | ₹ ३

# सरपंचाच्या हत्येने बीड हादरले!!



आधी केले अपहरण नंतर आढळून आला मृतदेह

पवनचक्कीचा वाद ठरला कारणीभूत, चर्चा?

खा.बजरंग सोनवणे लोकसभेत प्रश्न उपस्थित करणार

खुनाचा गुन्हा दाखल करण्यासाठी नातेवाईक आक्रमक

## सरपंच संतोष देशमुख यांची झाली निर्घृण हत्या

केज /पुण्यभूमी प्रतिनिधी

तालुक्यातील मस्साजोग येथील सरपंचाचे भर रस्त्यातून दुपारी अपहरण करून त्यांचा खून करण्यात आला असल्याने बीड जिल्ह्यात खळबळ माजली आहे.

मस्साजोगचे सरपंच संतोष पंडीतराव देशमुख हे त्यांचे आतेभाऊ शिवराज देशमुख यांच्यासोबत सोमवार (दि.९) डिसेंबर रोजी दुपारी ३ वाजण्याच्या सुमारास त्यांच्या टाटा इंडिगो गाडीमधून क्र.(एम एच ४५/बी ३०३२) मस्साजोगकडे जात होते. त्यावेळी शिवराज देशमुख हे गाडी चालवीत होते. केज येथुन मस्साजोगकडे जात असताना डोणगाव फाट्याच्या जवळ असलेल्या टोलनाक्या जवळ एका काळ्या रंगाची स्कार्पिओ क्र. (एम एच ४४/झेड ९३३३) स्कार्पिओ आडवी लावली. त्या गाडीतुन सहा जण खाली उतरले. त्यातील एकाने दरवाज्याची काच दगडाने फोडुन गाडीत पाहिले व दुसऱ्या डाव्या साईडच्या बाजुला जावुन सरपंच संतोष देशमुख यांचा दरवाजा उघडून त्यांना खाली ओढून लाकडी काठीने मारहाण केली. अपहरणकर्त्यांनी त्यांना सोबत आणलेल्या काळ्या रंगाची स्कार्पिओमध्ये बळजबरीने बसवुन केजच्या दिशेने भरधाव वेगात निघुन गेले.

या प्रकरणात सरपंच संतोष देशमुख यांचे अपहरण करण्यासाठी वापरलेली काळ्या रंगाची स्कॉर्पिओ गाडी ही सुदर्शन घुले रा. टाकळी तालुका केज यांची असल्याची माहिती आहे. अपहरण केल्यानंतर अपहरण झाल्याची माहिती पोलिसांना मिळताच तातडीने दोन पोलीस पथके तपासासाठी रवाना करण्यात आली होती.मात्र अवघ्या काही तासानंतरच पोलिसांना संतोष देशमुख यांचा मृतदेह केज ते नांदूर घाट रस्त्यावर दहीटना फाटा येथे आढळून आला. मयताच्या अंगावर मारहाणीचे व शास्त्राचे वार आहेत. पोलिसांनी मृतदेह उपजिल्हा रुग्णालय केज येथे आणला होता.



### बीडचा बिहार होतो आहे,ही बाब गंभीर : खा. बजरंग सोनवणे

सरपंच यांना गाडीत टाकून नेले आणि खून केला घटना दुर्दैवी व प्रचंड वेदना देणारी आहे. तरुण सरपंचाचा खून म्हणजे बीडचा बिहार असे खा. बजरंग सोनवणे यांनी म्हटले आहे. पवनचक्की च्या खंडणी प्रकरणात झालेला खून व त्या मागे कुणाचा हात आहे हे शोधले पाहिजे. बीडचे पोलीस अधीक्षक जर फोन उचलणार नसतील तर गंभीर आहे. आपण सदरील प्रश्न लोकसभेत उपस्थित करणार असून झालेला खून हा बीड पोलीस यंत्रनेवर प्रश्न उपस्थित करणारा आहे, असेही खा. सोनवणे म्हणाले.

### पुर्ववैमनस्यातून झाला खून!

सुदर्शन घुले यांनी दि. ६ डिसेंबर रोजी मस्साजोग येथे अवादा पवन ऊर्जा या पवनचक्की प्रकल्पाच्या अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना मारहाण केल्याची घटना घडली होती. त्या प्रकल्पावर सुरक्षा रक्षक म्हणून काम करीत असलेले सुरक्षा रक्षक हे मस्सा जोग येथील असल्याने सरपंच संतोष देशमुख यांनी त्यात हस्तक्षेप करून मारहाण करणाऱ्यावर गुन्हा दाखल करण्याची मागणी केली होती. त्याचा राग मनात धरून अपहरणकर्त्यांनी त्यांचा खून केला असल्याची चर्चा सुरु आहे.

### घटनास्थळी वरिष्ठांची धाव


घटनेचे गांभीर्य ओळखून अप्पर पोलीस अधीक्षक चेतना तिडके, सहाय्यक पोलीस अधीक्षक कमलेश मीना, केज पोलीस ठाण्याचे निरीक्षक प्रशांत महाजन, सहाय्यक निरीक्षक बनसोडे ,उपनिरीक्षक शिंदे ,पोलीस नाईक दिलीप गीते, यांच्यासह आदींनी घटनास्थळी धाव घेतली. तसेच रात्री उशिरा बीड येथून ही पोलिसांचा मोठा फौज फाटा केजकडे रवाना झाला होता.

### मारेकरी होते मागावर

सुदर्शन घुलेसह चौघांना जामीन मिळाल्यानंतर पवनचक्कीच्या गोदामात त्यांना मारहाण झाल्याचे व्हिडिओ सोशल मिडियावर व्हायरल झाले होते. याचा व मारहाणीचा राग मनात ठेवून सुदर्शन घुलेंनी इतरांच्या मदतीने सोमवारी डोणगाव टोल नाक्याजवळ देशमुखांचे अपहरण केले. त्यानंतर बोरगाव दैठाण रोडवर देशमुख यांचा मृतदेह आढळून आला

## लाडकी बहिण योजनेचा हप्ता पडणार

योजना:येत्या तीन दिवसात पडणार पैसे



मुंबई/पुण्यभूमी प्रतिनिधी

राज्यात महायुतीचं सरकार स्थापन झालेलं आहे. देवेंद्र फडणवीस यांनी मुख्यमंत्री पदाची शपथ घेतली, तर एकनाथ शिंदे आणि अजित पवार यांनी उपमुख्यमंत्री पदाची शपथ घेतली. सरकार स्थापन झालं असलं तरी अद्याप मंत्रिमंडळाचा विस्तार बाकी आहे. त्यामुळे मंत्रिमंडळाचा विस्तार कधी होणार? याकडे अनेकांचं लक्ष लागलेलं आहे. खरं तर राज्यात पुन्हा एकदा महायुती सरकार येण्यासाठी 'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण' योजना महत्वाचं मानली जाते. मात्र, आता लाडक्या बहिणींच्या अर्जांची छाननी होणार असल्याची चर्चा आहे. त्यामुळे लाडकी बहीण योजनेचा डिसेंबरचा हप्ता मिळणार की नाही? याबाबतही महिलांमध्ये संभ्रम आहे.दरम्यान, आता लाडकी बहीण योजनेच्या माध्यमातून लाभार्थी महिलांना देण्यात येणाऱ्या १५०० रुपयांचा डिसेंबरचा हप्ता कधी मिळणार? यासंदर्भातील महत्वाची माहिती समोर आली आहे. भाजपाचे नेते तथा माजी मंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी लाडकी बहीण योजनेसंदर्भात प्रतिक्रिया दिली आहे. तसेच लाडकी बहीण योजनेचा डिसेंबरचा हप्ता पुढील दोन ते तीन दिवसांत मिळणार असल्याचं सुधीर मुनगंटीवार यांनी सांगितलं आहे. ते टिव्ही ९ मराठी या वृत्तवाहीनीशी बोलत होते.आता सरकार स्थापन झालेलं आहे, सरकार अतिशय चांगलं काम करत आहे. आता लवकरच मंत्रिमंडळाचा विस्तार देखील होईल. मंत्रिमंडळाचा विस्तार झाल्यानंतर लगेचच मंत्रिमंडळाची बैठक होईल. काहीही चिंता करण्याची आवश्यकता

## सीरियावर बंडखोरांचा ताबा

देशविदेश: देशाची अखंडता जपण्यासाठी

दिल्ली/पुण्यभूमी प्रतिनिधी

सीरियामधील बंडखोरांनी राजधानी दमास्कसवर ताबा मिळवल्याचे आणि अध्यक्ष बशर अल असाद यांची राजवट उलथवून टाकल्याचे रविवारी (८ डिसेंबर) सरकारी वाहिनीवरून जाहीर करण्यात आले. तसेच, तुरुंगातील सर्व कैद्यांची मुक्तता करत असल्याचेही बंडखोरांनी घोषित केले. बंडखोर दमास्कसमध्ये शिरत असताना लष्कराने आधीच माघार घेतली होती. या घडामोडींच्या पार्श्वभूमीवर असाद



यांनी दमास्कस सोडले असून त्यांनी रशियात शरण घेतली आहे. बंडखोरांनी २७ नोव्हेंबर रोजी सीरियाच्या वायव्येस मोर्चेबांधणी केली. त्यानंतर बंडखोरांनी दक्षिणेकडे सरकण्यास सुरुवात केली. या बंडखोरांच्या अनेक तळांवर गेल्या काही दिवसांमध्ये बशर यांच्या फौजांनी आणि त्यांना पाठिंबा देणाऱ्या इराण, रशियासारख्या देशांनी हवाई हल्ले केले होते. परंतु, सीरियाच्या लष्कराकडे बंडखोरांचा रेटा थोपवण्याची क्षमता नव्हती. प्रत्येक ठिकाणी त्यांचा पराभव होऊ लागला. २९ नोव्हेंबर रोजी बंडखोरांनी अलेप्पो या सीरियाच्या दुसऱ्या मोठ्या शहरावर ताबा मिळवला.

बंडखोरांनी ५ डिसेंबर रोजी हमा आणि ७ डिसेंबर रोजी हॉम्स हे सीरियाचे तिसरे मोठे शहर पान २ वर...

## मायबाप जनतेसाठी सदैव तत्पर

आ.संदीप क्षीरसागर : विधानसभा सदस्यत्वाची शपथ



बीड/पुण्यभूमी प्रतिनिधी

बीड विधानसभा मतदारसंघाचे तब्बल दुसऱ्यांदा निवडून आलेले आमदार संदीप क्षीरसागर यांनी रविवारी (दि.८) रोजी विधानसभा सदस्य म्हणून शपथ घेतली. यावेळी मायबाप जनतेच्या आशीर्वादाने आमदार म्हणून काम करण्याची संधी आणि जबाबदारी मिळाली असून मायबाप जनतेच्या सेवेसाठी सदैव तत्पर असेल अशी ग्वाही आमदार संदीप क्षीरसागर यांनी यावेळी व्यक्त होताना दिली.

रविवारी (दि.८) रोजी महाविकास आघाडीतील विधानसभा सदस्यांचा शपथविधी पार पडला. यामध्ये बीड विधानसभा मतदारसंघातून सलग दुसऱ्यांदा निवडून आलेले आ.संदीप क्षीरसागर यांनी विधानसभा सदस्यत्वाची शपथ घेतली. छत्रपती पान २ वर...

## राज्यातील राजकीय संघर्षाचे केंद्र

नाना पटोले: ईव्हीएम मतदान प्रणालीवर सार्वत्रिक शंका



सोलापूर/पुण्यभूमी प्रतिनिधी

ईव्हीएम मतदान प्रणालीवर सार्वत्रिक शंका उपस्थित केली जात असताना माळशिरस तालुक्यातील मारकडवाडीच्या ग्रामस्थांनी मतपत्रिकेद्वारे चाचणी मतदानासाठी उचललेले पाऊल संपूर्ण देशात चर्चेचा विषय ठरला आहे. याच पार्श्वभूमीवर मारकडवाडीत ज्येष्ठ नेते शरद पवार यांनी येऊन ग्रामस्थांशी संवाद साधत ईव्हीएम प्रणाली विरुद्ध एल्गार पुकारल्यापाठोपाठ भाजपने आमदार सदाशिव खोत आणि आमदार गोपीनाथ पडळकर हे दोघे उद्या मंगळवारी सकाळी मारकडवाडीत येऊन ईव्हीएम प्रणालीच्या बाजूने सभा घेणार आहेत. त्यानंतर दुपारी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले हे देखील मारकडवाडीत येऊन ग्रामस्थांशी संवाद साधणार आहेत. त्यामुळे हे तीन हजार लोकसंख्येचे छोटेसे गाव राज्यातील राजकीय संघर्षाचे केंद्र बनले आहे.

मारकडवाडी गेल्या २५-३० वर्षांपासून आमदार उत्तम जानकर यांच्या पाठीशी कायम राहिले आहे. बलाढ्य मोहिते-पाटील विरुद्ध उत्तम जानकर यांच्यात पूर्वीच्या अनेक लढायांमध्ये या गावाने जानकर यांना साथ दिली आहे. परंतु यंदाच्या माळशिरस विधानसभा निवडणुकीत मारकडवाडीने जानकर यांच्या ऐवजी प्रतिस्पर्धी भाजपचे राम सातपुते यांना मोठे मताधिक्य दिले आहे. परंतु यात ईव्हीएम प्रणालीवर शंका घेत ग्रामस्थांनी आंदोलन चालविले आहे. ईव्हीएम प्रणालीवर झालेल्या मतदानाची पडताळणी करण्यासाठी गावकऱ्यांनी मतपत्रिकेद्वारे चाचणी मतदान स्वखर्चाने पान २ वर...

दुर्घटना

३ ठार, १७ गंभीर जखमी

## मुंबईत बेस्टच्या बसची अनेकांना धडक

मुंबई/पुण्यभूमी प्रतिनिधी

मुंबईतील कुर्ला परिसरात भीषण अपघाताची घटना घडली असल्याची माहिती समोर आली आहे. एका भरधाव बेस्टच्या बसने अनेकांना धडक दिली आहे. या अपघातामध्ये १७ जण जखमी झाले असून ३ जणांचा मृत्यू झाल्याची माहिती समोर आली आहे. या अपघातात जखमी झालेल्यांना तात्काळ उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आलं आहे.ही अपघाताची घटना घडल्यानंतर घटनास्थळी नागरिकांनी मोठी गर्दी केली आहे. दरम्यान, घटना घडल्यानंतर लगेच घटनास्थळी पोलीस दाखल झाले असून बेस्टच्या बस चालकाला ताब्यात घेण्यात आलं आहे. मुंबईतील कुर्ला परिसरातील एलबीएस रोड या ठिकाणी ही घटना पान २ वर...



### आमदार मंगेश कुडाळकर काय म्हणाले?

या घटनेतील जखमी झालेल्यांना वाचवण्यासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आलेलं आहे. तसेच या घटनेसंदर्भात प्रशासनाला आणि पोलिसांना देखील सूचना देण्यात आलेल्या आहेत. तसेच या घटनेत जो कोणी दोषी असेल त्याच्यावर कारवाई झाली पाहिजे, असं आमदार मंगेश कुडाळकर यांनी एका मराठी वृत्तवाहीनीशी बोलताना म्हटलं आहे.

### वर्षा गायकवाड यांचं ट्विट काय?

काँग्रेसच्या खासदार वर्षा गायकवाड यांनी या घटनेनंतर ट्विट करत म्हटलं आहे की, हे अत्यंत धक्कादायक आणि चिंताजनक आहे. ज्यांनी आपले प्रियजन गमावले त्यांच्या कुटुंबियांबद्दल माझ्या मनापासून संवेदना आणि जखमींसाठी प्रार्थना. या घटनेची सखोल चौकशी झाली पाहिजे. तसेच बाधित कुटुंबांना शक्य तितकी मदत मिळायला हवी, अशी मागणी काँग्रेसच्या खासदार वर्षा गायकवाड यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे केली आहे.

## सरपंच खून प्रकरणात गुन्हा नोंदवा

आक्रमक: सचिन मुळूक, स्वप्नील गलधर यांची मागणी

बीड/पुण्यभूमी प्रतिनिधी

केज तालुक्यातील मस्साजोगचे माजी सरपंच संतोष देशमुख यांचे आज अपहरण करुन त्यांचा खुन केल्याची घटना घडली आहे. या प्रकरणामागे पवनचक्की उभारणाऱ्या कंपनीच्या अधिकाऱ्यांचा व कॉन्ट्रॅक्टरचा हात असण्याची शक्यता आहे. या प्रकरणाचा पोलिसांनी सखोल तपास करुन पवनचक्की कंपनी व कॉन्ट्रॅक्टर वर खुनाचा गुन्हा दाखल करावा अशी मागणी शिवसेना जिल्हाप्रमुख सचिन मुळूक, स्वप्नील गलधर यांनी केला आहे.

जिल्ह्यामध्ये पवनचक्की उभारण्याचे काम एका कंपनीकडून सुरू आहे. शेतकऱ्यांच्या शेतामध्ये पवनचक्की उभारल्या जात आहेत.



यासाठी संबंधीत कंपनीकडून शेतकऱ्यांना नियमानुसार जमिनीचा मावेजा देणे बंधनकारक आहे. मात्र बीड जिल्ह्यात पवनचक्की कंपनीच्या अधिकाऱ्यांची मनमानी सुरू आहे. जिल्हाभरात पवनचक्की उभारण्याचे काम सुरू असून पवनचक्की कंपनीच्या अधिकाऱ्यांकडून शेतकऱ्यांना जमिनीचा मावेजा दिला जात नाही. शेतकऱ्यांनी मावेजा मागितला तर स्थानिक गुंडांकडून धमकावण्याचे प्रकार घडत आहेत. तसेच शेतकऱ्यांनी मावेजासाठी पवनचक्कीचे काम अडविले तर पवनचक्की उभारणाऱ्या कंपनीचे अधिकारी उलट शेतकऱ्यांनाच जेलमध्ये टाकण्याची धमकी देतात. असल्याचा आरोप मुळूक, गलधर यांनी केला आहे. दरम्यान केज तालुक्यातील मस्सजोगचे माजी सरपंच संतोष देशमुख यांचे दोन दिवसांपूर्वी पवनचक्की उभारणाऱ्या कंपनीच्या अधिकाऱ्यांसोबत वाद झाल्याची माहिती समोर येत आहे. या प्रकरणी गुन्हाही नोंद झाला आहे. या घटनेला दोन दिवसांचा कालावधी पान २ वर...

## दोन पुढे, चार मागे!

रिझर्व्ह बँकेच्या तिमाही पतधोरणात व्याजदर कपातीचा निर्णय घेतला गेला नाही, यात ‘बातमी’ नाही. व्याजदर बदलले जाणार नाहीत असा अंदाज अनेकांनी व्यक्त केलेला होता. तो बरोबर निघाला इतकेच. ‘बातमी’ आहे ती रिझर्व्ह बँकेने दिलेल्या कबुलीमध्ये. देशाच्या अर्थविकासाची गती आपण प्रत्यक्षापेक्षा जास्त गृहीत धरली अशी; अप्रत्यक्षपणे का असेना; पण कबुली रिझर्व्ह बँकेच्या पतधोरण निवेदनातून आणि नंतर गव्हर्नर शक्तिकांत दास यांच्या पत्रकार परिषदेतून दिली गेली. पतधोरणाचा निर्णय गव्हर्नर घेत नाहीत. त्यासाठी पाच सदस्यीय समिती असते आणि त्या समितीच्या बैठकीत हा निर्णय घेतला जातो. या बैठकीचे इतिवृत्त लवकरच प्रसृत होईल. पण दिसते ते असे की या समितीचे पाचही सदस्य व्याजदर कपात करू नये या मताचे होते. म्हणजे एका अर्थी या समितीने सरकारच्या दृष्टिकोनास केराची टोपली दाखवली. मध्यंतरी अर्थमंत्री निर्मला सीतारामन, वाणिज्य मंत्री पीयूष गोएल ते अनेक लुंगेसुंगे सरकारवादी खाद्यान्न घटक चलनवाढ मापनातून वगळले जायला हवेत, असे तत्त्वज्ञान मांडत होते. म्हणजे कांद्याबटाट्याच्या दरवाढीचा विचार केल्यामुळे चलनवाढ ‘दिसते’, सबब या अशा घटकांना चलनवाढ मापनातून वगळा, अशी यांची मसलत. म्हणजे गणितात अनुत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्याने हा विषयच परीक्षेत घेऊ नका, अशी शिफारस करण्यासारखे. अलीकडे शिक्षण क्षेत्रात अशी शिफारस करणारे आणि तीपुढे मान तुकवणारे मोठ्या प्रमाणावर बोकाळले असले तरी निदान बँकिंग क्षेत्रात तरी शहाणपण अद्याप शिल्लक आहे म्हणायचे. शिक्षण क्षेत्रातून दुर्मीळ होत चाललेल्या शहाण्या शिक्षकाप्रमाणे रिझर्व्ह बँक वागली. गव्हर्नर शक्तिकांत दास यांच्या या खेपेच्या गव्हर्नरपदावरचे हे शेवटचे पतधोरण. त्यांना या पदावर आणखी एक मुदतवाढ मिळते किंवा कसे हे पुढील दोन दिवसांत स्पष्ट होईल. तूर्त या पतधोरणाविषयी.त्यात या धोरण समितीने चलनवाढीचा वेग ही डोकेदुखी असल्याचे मान्य केले आणि सध्या घरंगळलेल्या विकास दराकडे पाहात देशाच्या आर्थिक वाढीचा आपला अंदाज कमी केला. गेली दोन वर्षे रिझर्व्ह बँकेस हे करावे लागलेले आहे. म्हणजे सुरुवात मोठी आश्वासक करायची आणि प्रत्येक तिमाहीला पुढल्या तिमाहींत हा दर कमी कमी होत जाईल हे मान्य करायचे. सरत्या तिमाहीत भारतीय अर्थव्यवस्थेचा आलेख दाणकन आपटला. ते घरंगळणे नव्हते. ते आदळणे. कारण अपेक्षित विकासदरापेक्षा प्रत्यक्ष दर एक टक्क्याहून अधिक कमी आढळला. त्यामुळे रिझर्व्ह बँकेने आपल्या भाकिताचीही पुनर्मांडणी केली असून देशाच्या मध्यवर्ती बँकेच्या मते आपली वार्षिक वाढ सात टक्क्यांपेक्षा कमी असू शकेल. या दु:खावर मनमोहन सिंग सरकारच्या काळात विरोधी पक्षीय नेत्यांच्या राणा भीमदेवी वक्तव्यांचे स्मरण हा उतारा ठरेल. रुपया घसरल्याबद्दल, अर्थविकासाचा वेग मंदावत असल्याबद्दल, तो वाढवण्याची अक्कल आणि क्षमता तत्कालीन सरकारकडे कशी नाही याबद्दल विरोधी पक्षीय प्रेषितांनी त्या वेळी केलेली वक्तव्ये आता आठवली तर किमान अक्कल असलेल्यांसही ‘त्या वेळेपेक्षा आता अर्थविकास मंद कसा’ इतका साधा; वा डॉलरच्या तुलनेत रुपयाचा अवमूल्यनी अपमान अजूनही का सुरू असा प्रश्न पडू शकेल. त्या वेळी रुपयाचे मूल्य पंतप्रधानांच्या वयाप्रमाणे ‘वाढत’ जाईल अशा टिप्पणीतून त्यांना ‘नामर्द’ वगैरे ठरवणारे मर्द सध्या या विषयावर मौन पाळून असतात. अर्थात आता रिझर्व्ह बँक आणि अन्य सरकारी माध्यमातूनच अर्थव्यवस्थेचे वास्तव समोर येत असल्याने मौनाखेरीज पर्याय नाही.तेव्हा कितीही छातीठोक दावे केले तरी आपली अर्थव्यवस्था मंदगती पीडित आहे हे नाकारता येणे आता तरी अशक्य. याची दुसरी तीही अप्रत्यक्ष कबुली मुख्य केंद्रीय अर्थसल्लागार अनंत नागेश्वरन यांच्याकडून दुसऱ्या एका प्रसंगी दिली गेली. उद्योगपती, व्यावसायिकांच्या संघटना अधिवेशनात भाष्य करताना त्यांनी खासगी उद्योगांस उपदेशामृत पाजले. कशासाठी? तर या खासगी उद्योगांतील कर्मचाऱ्यांना अपेक्षित वेतनवाढ दिली जात नाही; म्हणून. पुरेशी वेतनवाढ दिली जात नसल्याने या उद्योगांतील कर्मचाऱ्यांहाती खेळता पैसा नाही, वेतनवाढ आणि चलनवाढ साधारण एकाच गतीने होत असल्याने प्रत्यक्ष वेतनाद्वारे हातात येणाऱ्या रकमेचे मूल्य तेवढेच राहते. पण चलनवाढीमुळे ग्राहकोपयोगी घटकांच्या किमती वाढलेल्या असतात. या दरवाढीवर मात करण्याइतके वेतन नसल्याने हे कर्मचारी खर्च करू शकत नाहीत आणि ते खर्च करू शकत नाहीत त्यामुळे मागणी वाढत नाही. आणि मागणी वाढती नसल्याने उद्योगाचे चक्र मंदावते, असे हे त्रैराशिक. म्हणजे सरकारने जे करायला हवे ते केले जाणार नाही आणि तरीही खासगी उद्योजकांनी काय करायला हवे त्याचा उपदेश सरकार करणार. सरकार आपल्या हातातील निधी अर्थव्यवस्थेस आवश्यक कृत्यांपेक्षा अन्य रेवड्या आणि रमणे यांवर खर्चणार, अत्यंत पोकळ अशा उत्पादन आधारित अनुदान योजना (प्रॉडक्शन लिंक्ड इन्सेन्टिव्हज– पीएलआय) राबवणार, विविध घटकांवर आयातकर वाढवून अधिकाधिक सुरक्षावादी होत जाणार आणि तरीही खासगी क्षेत्राने मात्र कसे वागायला हवे यावर प्रवचने देणार, असा हा प्रकार. आपल्या खासगी क्षेत्रातील मान्यवरांची कणाहीनता विचारात घेता यावर कोणीही भाष्य करणार नाही, हे खरे. पण त्याच वेळी गुंतवणूक वाढवा, तुमच्यातली स्पर्धात्मकता (ॲनिमल स्पिरिट) वाढवा अशा प्रकारच्या अर्थमंत्र्यांच्या उपदेशामृतांकडे म्हणूनच खासगी उद्योजक डोळेझाक करतात हेही तितकेच खरे. आपली मुखदुर्बळता कृतीतून झाकण्याचा त्यांचा हा प्रयत्न केविलवाणा ठरतो. पण ते तरी काय करणार, हा प्रश्नच. तो २१ डिसेंबरास होऊ घातलेल्या ‘वस्तू व सेवा कर समिती’च्या (जीएसटी कौन्सिल) बैठकीत अधिक गंभीर होऊ शकेल, अशी चिन्हे दिसतात. राजस्थानातील रमणीय आणि कमनीय वालुकालाटांसाठी विख्यात जैसलमेर येथे ही बैठक होईल. हा कडाक्याच्या थंडीचा काल. पण या बैठकीसमोरील कार्यक्रम लक्षात घेतल्यास उद्योग जगतास हुडहुडी भरण्याऐवजी घाम फुटेल. कारण या कराचा आणखी एक स्तर (स्लॅब) या बैठकीत प्रस्तावित आहे. तो ३५ टक्के इतका प्रचंड असेल. आधीच आपला हा वस्तू–सेवा कर इतक्या कर–स्तरांनी अष्टावक्र बनलेला आहे.

# विधानसभेची नवी दिशा



अखेर ५ डिसेंबर २०२४ रोजी महाराष्ट्राचे एकविसावे मुख्यमंत्री म्हणून देवेंद्र सरिता गंगाधरराव फडणवीस यांनी शपथ घेतली. तसेच माजी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि माजी उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांनी उपमुख्यमंत्र्यांची पदाची शपथ आझाद मैदानामध्ये भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि अन्य हजारो मान्यवरांच्या उपस्थितीत घेतली. आता लवकरच मंत्रिमंडळही आकाराला येईल. महाराष्ट्र विधानसभेत प्रचंड बहुमताने निवडून आलेल्या महायुती सरकारचे सरकारचे भरीव योगदान आगामी पाच वर्षात आपल्या महाराष्ट्राला सर्वार्थाने पुढे नेण्यामध्ये असावे ही अपेक्षा सर्वांचीच आहे.त्यातही यंदा एकटा भाजप जवळपास बहुमताच्या रेषेपर्यंत पोहोचला. एवढा मोठा विजय महायुतीला आणि एवढा दारुण पराभव महाआघाडीला अपेक्षित नव्हता. लोकसभा निवडणुकीत महाआघाडीला संख्यात्मक दृष्ट्या मोठे यश मिळाल्याच्या पार्श्वभूमीवर तो काहींना धक्कादायक वाटणाराही होता. अर्थात मतांच्या टक्केवारीत फारसा मोठा फरक नव्हता हे खरेच. कदाचित त्यामुळे महाआघाडी आपण सत्तेवर येणारच अशा हवेत राहिली. त्यातूनच जागा वाटपाचा घोळ अर्ज भरणाऱ्या तारखेपर्यंत झाला, मुख्यमंत्रीपदावर चर्चा केली गेली. या निवडणुकीत महायुती जेवढी एकसंघ पद्धतीने लढताना दिसत होती तितकी महाआघाडी दिसत नव्हती हे वास्तव आहे.या निवडणुकीत जनतेने भाजपच्या नेतृत्वाखालील युतीला अतिशय मोठ्या प्रमाणात निवडून दिलेले असल्याने आता राज्याच्या विकासात विरोधकांचा अडथळा आहे असे म्हणता येणार नाही. केंद्र सरकारचेही पूर्ण सहकार्य राज्य सरकारला असणार आहे. त्यामुळे राज्याची सर्व आघाड्यांवर होत असलेली घसरण थोपवून हे राज्य देशातील सर्वात अग्रगण्य राज्य म्हणून आघाडीवर आणण्याची संधी देवेंद्र फडणवीस यांना आहे. शिवाय त्यांचे भाजपमधील स्थान व वलय मोदी आणि शहा यांच्या पाठोपाठ अतिशय महत्त्वाचे झाले आहे. पक्षांतर्गत आणि पक्षाबाहेरही त्यांचे वजन वाढलेले आहे. त्याचाही लाभ त्यांनी महाराष्ट्राच्या सर्वांगीण विकासासाठी करून घ्यावा आणि शपथविधीच्या जाहिरातीत ‘आता महाराष्ट्र थांबणार नाही’ असे केलेले सूतोवाच खरे ठरावे ही अपेक्षा. मुख्यमंत्री म्हणून तिसऱ्यांदा शपथ घेणारे देवेंद्र फडणवीस पाच वर्षाचा कार्यकाळ दुसऱ्यांदा पूर्ण करू शकतील असे दिसते. एकूण ही नवी विधानसभा नव्या दिशेने जाताना दिसत आहे.निवडणूक काळात महायुतीने जे जाहीरनामे प्रकाशित केले त्यामधून दिलेल्या आश्वासनांची पूर्तता करणे ही नव्या सरकारची नैतिक जबाबदारी आहे. महाराष्ट्राचे दरडोई उत्पन्न घटले आहे ते वाढवणे गरजेचे आहे. महाराष्ट्रातील उद्योगधंदे गुजरात व इतरत्र न जाऊ देता राज्यात रोजगार निर्मिती करणे हेही महत्त्वाचे आहे. व्यवस्थेत वाढलेला भ्रष्टाचार समूळ नष्ट करणे अशक्य असले तरी त्यावर आळा घालण्याची नितांत गरज आहे. महाराष्ट्रातील सामाजिक – सांस्कृतिक वातावरण प्रदूषित होत चालले आहे.त्याच्या पर्यावरणात मोठी सुधारणा करण्याची गरज आहे. या साऱ्याची जबाबदारी अर्थातच मुख्यमंत्री या नात्याने देवेंद्र फडणवीस यांच्यावर आहे. कारण जे यशाचे शिल्पकार असतात ते अपयशी ठरत गेले तर त्यांनाच अपयशाचे धनी ठरवले जात असते. सरकार महायुतीचे असले तरी सर्व निर्णय केंद्रीय नेतृत्वाच्या मार्गदर्शनाखाली मुख्यमंत्रीच घेणार आणि दोन्ही उपमुख्यमंत्री ‘मम’ म्हणणार अशी महायुतीची नेपथ्य रचना आहे.मुंबई ही देशाची आर्थिक राजधानी आहे आणि महाराष्ट्र हे देशातील महत्त्वाचे राज्य आहे. त्यामुळे केंद्राच्या सत्तेमध्ये यावेळी भाजप केवळ स्वबळावर नसल्यामुळे भाजपच्या दृष्टीने महाराष्ट्रातील हा विजय अत्यावश्यक होता. त्यासाठी त्यांनी सर्व प्रकारचे प्रयत्न केले यात शंका नाही. साधनशुचिता हा शब्द राजकारणातून अलीकडे हद्दपार झालेला आहे. त्यापेक्षा साध्यप्रियता महत्त्वाची ठरलेली कोणीही यावे आणि पावन होऊन जावे अशी आजची स्थिती आहे. मुख्यमंत्री पदाचा पदभार स्वीकारल्यानंतर मंत्रालयात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पत्रकारांशी संवाद साधला. सर्व माजी मुख्यमंत्र्यांना व विरोधी पक्षांतील नेत्यांना आपण व्यक्तिगत फोन करून शपथविधीला निमंत्रित केले होते हे त्यांनी आवर्जून नमूद केले ही चांगली बाब आहे.गेल्या काही वर्षात महाराष्ट्राची राजकीय संस्कृती बदलली आहे आणि त्याला प्रस्थापित सर्वच राजकीय पक्ष आणि त्यातील काही वाचाळवीर जबाबदार आहेत. आता मोठ्या बहुमताचे सरकार पाच वर्षासाठी सत्तेवर आल्याने विरोधातील दोन–दोन पक्षच पूर्णतः त्याच्या चिन्हासह फोडण्याची गरज नाही हे खरे. परंतु एकूणच निवडणूक आता सैद्धांतिक विचारांवर नाही तर व्यवस्थापन कौशल्यावर लढावी लागते. त्यात जो बाजी मारेल तो जिंकतो हे स्पष्ट झाले आहे. या निवडणुकीत देशभरातून संघाचे नव्वद हजार स्वयंसेवक प्रचारासाठी आल्याचे खुद्द आमदार पंकजा मुंडे यांनी जाहीरपणे सांगितले होते. गाजावाजा न करता काम करणाऱ्या स्वयंसेवकांची ही मोठी फौज आणि तिला नेमकेपणाने कार्यान्वित करणारी यंत्रणा हेही भाजपचे बलस्थान राहिले आहे. निवडणूक काळामध्ये कोणत्या नेत्याने कोठे, कोणता मुद्दा मांडायचा आणि तो माध्यमे व समाज माध्यमांच्या द्वारे जनतेपर्यंत कसा पोहोचवायचा याची एक योजनाबद्ध आखणी अलीकडे निवडणुकीत दिसून येते आहे. सावत्र भाऊ, व्होट जिहाद , लव्ह जिहाद, जमीन जिहाद, बटेंगे तो कटेंगे , एक है तो सेफ है, लाल मुखपृष्ठाचे संविधान , अर्बन नक्षल असे अनेक मुद्दे प्रचाराच्या वेगवेगळ्या टप्प्यावर भाजपने आणले. हा निवडणूक जिंकण्याच्या व्यवस्थापनाचाच भाग होता. मूलभूत मुद्द्यांपेक्षा भावनिक मुद्दे पुढे आणणे याचे प्रमाण अलीकडे वाढत चालले आहे. या निवडणुकीत एकूणच प्रचाराची पातळी आणि जाहिरातींचा दर्जा कमालीचा घसरला होता हे कोणीही सुज्ञ मान्य करेल. पैशाचा अमाप वापर तसेच खुद्द पंतप्रधानांनी ज्याला रेवडी वाटणे म्हटलेले होते अशा रेवड्या अधिकृतपणे वाटण्याचे प्रमाणही प्रचंड होते.

त्यामुळे आता प्रश्न उरला आहे तो विरोधकांच्या रणनीतीचा आणि व्यवस्थापन कौशल्याचा. येत्या तीन–चार महिन्यात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या होणाऱ्या निवडणुका सत्ताधारी व विरोधक यांच्यासाठी महत्त्वाच्या असतील यात शंका नाही.

(लेखक समाजवादी प्रबोधिनी, इचलकरंजीचे कार्यकर्ते तसेच या प्रबोधिनीच्या वतीने प्रकाशित होणाऱ्या ‘प्रबोधन प्रकाशन ज्योती ‘मासिकाचे संपादक आहेत.

## पान एक वरून

**लाडकी बहिण योजनेचा**

नाही. सर्व विभाग त्यांचं काम करत आहेत. चांगले निर्णय होत आहेत. आता लाडक्या बहिणींचा हप्ता देखील पुढील दोन ते तीन दिवसांत मिळणार आहे. कुठेही काहीही अडचण नाही, असं सुधीर मुनगंटीवार यांनी म्हटलं आहे.

विधानसभा निवडणूक निकालांना ‘कलाटणी’ देणाऱ्या ‘मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण’ योजनेलाच सरकार कलाटणी देणार असल्याची सध्या चर्चा आहे. अडीच लाखांपेक्षा जास्त वार्षिक उत्पन्न तसेच घरात चारचाकी वाहन असलेल्या महिलाही या योजनेचा लाभ घेत असल्याच्या तक्रारी प्राप्त झाल्या असून त्यामुळे आता लाडकी बहीण योजनेतील लाभार्थी महिलांच्या अर्जांची छाननी केली जाणार आहे. छाननीनंतर नियमबाह्यपणे अर्ज बाद केले जातील, अशी चर्चा आहे. मात्र, खरंच अशी छाननी होणार आहे की नाही याबाबत आदिती तटकरे यांनी माहिती दिली आहे.

आदिती तटकरे म्हणाल्या, मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना राबवत असताना आम्ही ती योजना अगदी व्यवस्थितपणे राबवण्याचा प्रयत्न केला. २ कोटी ४० लाख महिलांना या योजनेचा लाभ मिळत आहे. कोणत्याही योजनेची एवढ्या मोठ्या संख्येने छाननी केली जाणार नाही. त्यासाठी मुळात तक्रार याव्या लागतात. मी आता त्या विभागाची मंत्री नाही. तेव्हा अशा पद्धतीने तक्रार आली असेल तर माझ्याकडे त्याबद्दलची माहिती नाही. छाननी किंवा चाचणी करायची झाल्यास तक्रारीच्या आधारे करावी लागते. कोणी तक्रारी केल्या तर त्या तपासल्या जातील. मी मंत्री असताना अशा तक्रारी आल्या नव्हत्या. आत्ता आल्यात की नाही ते मला माहिती नाही. कोणीही अशा पद्धतीने तक्रार केली असेल तर विभागाचे आधिकारी निर्णय घेतात. आता तक्रारी आल्यात की नाही यासंदर्भातील मला माहिती नाही, असं आदिती तटकरे यांनी म्हटलं.

**सीरियावर बंडखोरांचा**

बंडखोरांनी जिंकून घेतले. इराण सध्या इस्रायलबरोबरच्या संघर्षात व्यस्त आहे. लेबनॉनमधील हेझबोला ही संघटना मरनासन्न अवस्थेत आहे. इस्रायलने लेबनॉनचं कंबरडं मोडलंय. रशियाचं बळ युक्रेनबरोबरच्या युद्धात खर्च होत आहे. त्यामुळे सीरियाला त्यांच्या मित्रराष्ट्रांकडून पुरेशी मदत मिळाली नाही. अखेर दमास्कस हे राजधानीचे शहर तुलनेने फारच कमी प्रतिकारासह बंडखोरांच्या ताब्यात आले.

**भारताचे नागरिकांना परत आणण्याचे प्रयत्न**

: दमास्कस ताब्यात घेतल्यानंतर बंडखोर इराणच्या दूतावासामध्ये घुसले आणि तिथे मोडतोड केली. परिस्थिती लक्षात घेऊन इराकने आपले दूतावास रिकामे केले असून तेथील कर्मचाऱ्यांना लेबनॉनमध्ये हलवले. दरम्यान, लेबनॉनने बैरुतला दमास्कसशी जोडणारा मार्ग वगळता सीरियाबरोबरची भूसीमा बंद करत असल्याचे सांगितले आहे. आमच्या नागरिकांना देशाबाहेर जाऊ दिले जावे असे आवाहन चीनने तेथील संबंधित पक्षांना केले आहे. भारतानेही शनिवारीच आपल्या नागरिकांसाठी धोक्याची सूचना जारी केली आहे. त्याशिवाय अन्य देशही आपापल्या नागरिकांना तेथून सुरक्षितपणे बाहेर काढण्याच्या प्रयत्नात आहेत.

**राज्यातील राजकीय संघर्षाचे**

घेण्याची तयारी सुरू केली होती. परंतु प्रशासनाने चाचणी मतदानाची प्रक्रिया थांबविल्यामुळे मारकडवाडी संपूर्ण देशात चर्चेचा विषय ठरली आहे.याच पार्श्वभूमीवर दोन दिवसांपूर्वी ज्येष्ठ नेते शरद यांनी मारकडवाडीत येऊन ग्रामस्थांशी संवाद साधला होता. त्याचवेळी दुसरीकडे भाजपने या गावात केलेल्या विकासकामाचे लावलेले डिजिटल फलक चर्चेत आले असता त्यास प्रत्युत्तरादाखल ‘ईव्हीएम हटावो–देश बचावो’ असा संदेश देणारे डिजिटल फलक लावण्यात आले आहेत. शरद पवार यांचा मारकडवाडी ग्रामस्थांशी झालेला संवाद, परस्परविरोधी डिजिटल फलकांचे युद्ध सुरू असताना भाजपचे आमदार सदाभाऊ खोत आणि आमदार गोपीनाथ पडळकर हे दोघे उद्या मंगळवारी मारकडवाडीत येऊन सभा घेणार आहेत. या सभेत प्रामुख्याने बलाढ्य मोहिते–पाटील गटाला लक्ष्य केले जाणार आहे. ईव्हीएम प्रणालीच्या विरोधात खोटे कथानक निर्माण करण्यामागे मोहिते पाटील यांचाच हात असल्याचा दावा खोत आणि पडळकर हे करणार आहेत. भाजपच्या सभेनंतर लगेचच दुपारी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले हे मारकडवाडीस देऊन ग्रामस्थांशी संवाद साधणार आहेत. त्यामुळे हे गाव राज्यातील राजकीय संघर्षाचे केंद्र बनल्याचे मानले जात आहे.

**मायबाप जनतेसाठी**

शिवाजी महाराज, भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकर, क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिबा फुले यांचे स्णरण करून आ.क्षीरसागर यांनी आमदारकीची शपथ घेतली. बीड विधानसभा मतदारसंघाचे असलेले सर्व प्रश्न या पवित्र सदनात मांडून बीडच्या जनतेने दिलेली जबाबदारी पार पाडणार असल्याचे आ.संदीप क्षीरसागर यांनी सांगितले.

**मुंबईत बेस्टच्या बसची**

घडली आहे. या परिसरामधून ही बस जात असताना बस चालकाने भरधाव बस चालवल्याने अनेकांना धडक बसली. या अपघातात जवळपास १७ जण जखमी झाले आहेत. तसेच ३ जणांचा मृत्यू झाला आहे. तसेच मृतांचा आकडा वाढण्याची शक्यता देखील वर्तवण्यात येत आहे.दरम्यान, या अपघातात काही गाड्यांचा देखील चक्काचूर झाल्याचं सांगितलं जात आहे. तसेच बेस्ट बसचा चालक हा मद्यधुंत अवस्थेत असल्याचा आरोप देखील आता नागरिकांकडून करण्यात येत आहे. आता या घटनेचा तपास पोलिसांनी सुरु केला असून पोलिसांनी बस चालकाला ताब्यात घेतलं आहे. मात्र, या घटनेमुळे मुंबईत खळबळ उडाली आहे.

**सरपंच खून प्रकरणात**

झाल्यानंतर आज डोणगाव परिसरातून संतोष देशमुख यांचे अपहरण करण्यात आले. यानंतर बोरगाव–दैठण रस्त्यावर त्यांचा मृतदेह आढळून आला. या खुनामागे पवनचक्की उभारणाऱ्या कंपन्यांच्या अधिकाऱ्यांचा व कॉन्ट्रॅक्टरचा हात असण्याची शक्यता असून पोलिसांनी या प्रकरणाची सखोल चौकशी करून कंपनी व कॉन्ट्रॅक्टर वर कुणाचा गुन्हा दाखल करावा अशी मागणी मुळूक, गलधर यांनी केला आहे.

## मोदी सरकारने अत्याचार रोखावेत

### आक्रमक: सर्व जाती–धर्म एकता मंचची मागणी

सोलापूर/पुण्यभूमी प्रतिनिधी

बांगलादेशात अराजकता माजल्यानंतर हिंदू समाजावर मोठ्या प्रमाणात अन्याय, अत्याचार होत आहेत. अनेक मंदिरांची नासधूस होत आहे.या बाबीची केंद्रातील मोदी सरकारने गंभीर दखल घेऊन कठोर पावले उचलावीत, अशी मागणी सोलापुरातील सर्व जात–धर्म एकता मंचने केली आहे. या संदर्भात जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांना मनसेच्या शिष्टमंडळाने भेटून निवेदन सादर केले आहे. १९७२ साली तत्कालीन पंतप्रधान इंदिरा गांधी यांच्या खंबीर नेतृत्वाखाली भारत सरकारने पाकिस्तानला धडा शिकवून बांगलादेशाची निर्मिती करण्यात मोठा वाटा उचलला होता. परंतु याच बांगलादेशात अलीकडे राजकीय अराजकता माजल्यानंतर तेथील हिंदू समाजाला मोठ्या प्रमाणात लक्ष्य बनविले जात आहे. हिंदू कुटुंबीयांच्या विरोधात मोठ्या प्रमाणात हिंसाचार होत असून मंदिरांचीही नासधूस केली जात आहे. ही बाब तमाम भारतीयांच्या दृष्टीने अस्वस्थ करणारी संतापजनक ठरली आहे. केंद्रातील मोदी सरकारने या प्रश्नावर वेळीच कठोर पावले उचलून बांगला देशातील हिंदू समाजावरील वाढते अन्याय अत्याचार थांबवावेत. त्यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी स्वतःची आंतरराष्ट्रीय प्रतिष्ठा पणाला लावावी, अशी मागणी या शिष्टमंडळाने केली आहे.अखिल भारतीय मराठा महासंघाचे दास शेळके, वीरशैव लिंगायत समाजाचे विजयकुमार हत्तुरे, मुस्लीम समाजाचे रसूल पठाण, शीख समाजाचे पोपटसिंग टाक, ख्रिश्चन समाजाचे जेम्स जंगम, जैन समाजाचे पराग शहा यांच्यासह वडार समाजाचे शंकर चौगुले, जांबमुनी मोची समाजाचे देवेंद्र भंडारे, वीरशैव गवळी समाजाचे सागर कलागते, धनगर समाजाचे राज सलगर, बंजारा समाजाचे युवराज राठोड, चर्मकार समाजाचे संजय शिंदे, कोळी समाजाचे गणेश कोळी, नवबौद्ध समाजाचे प्रमोद गायकवाड, मातंग समाजाचे सुरेश पाटोळे, ब्राह्मण समाजाचे अजित कुलकर्णी, बेरड समाजाचे शाम धुरी आदींचा या शिष्टमंडळात समावेश होता.

## पान सहा वरून

**विदर्भात संत बंकटस्वामी**

संत बंकट स्वामी महाराज यांचे भव्य मंदिर स्थापन केले आहे. त्या मंदिरात मूर्ती प्राणप्रतिष्ठा सोहळा व कलशारोहण सोहळा दिनांक १२ रोजी संपन्न होत आहे.याच सोहळ्यासाठी श्रीक्षेत्र नेकनूर पंचक्रोशी व बंकट स्वामी महाराज भक्त परिवारातील शेकडो गाड्या विदर्भात दिनांक ११ रोजी सकाळीं १० वाजता श्रीक्षेत्र नेकनूर येथून रवाणा होणारं आहेत. मराठवाडा ,कोकण,विदर्भ,खानदेशासह पश्चिम महाराष्ट्रातही संत बंकट स्वामी महाराज यांनी वारकरी संप्रदायाच्या प्रचार प्रसाराचे प्रभावी काम केले होते त्याचीच पावती म्हणून हे मंदिर निर्माण होत असल्याने बीड जिल्ह्यासाठीही स्वाभिमानाची बाब आहे.

**आदित्य कृषि महाविद्यालयात**

योगदान या विषयी विद्यार्थ्यांना माहिती देण्यात आली.हा कार्यक्रम आदित्य शिक्षण संस्थेचे मुख्य प्रवर्तक सुभाषचंद्रजी सारडा, संचालक डॉ.आदित्य सारडा यांच्या मार्गदर्शनाखाली वसंतराव नाईक कृषी विद्यापीठ परभणी च्या कार्यकारी सदस्या तथा आदित्य शिक्षण संस्थेच्या संचालिका डॉ.आदिती सारडा यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये घेण्यात आला. यावेळी डॉ. आदिती सारडा विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना कृषि क्षेत्रात कृषि पदवीधरांचे महत्त्व व योगदान तसेच हवामान बदलाचा कृषि क्षेत्रावर होणाऱ्या परिणामावर कृषी क्षेत्रातील शिक्षणामुळे कशाप्रकारे मात करता येऊ शकते याबद्दल विद्यार्थ्यांशी हितगुज केले. सदरील कार्यक्रमाची प्रस्तावना सहा. प्रा. ए.के. सहाने यांनी केली. या कार्यक्रमास आदित्य कृषि महाविद्यालयाचे प्राचार्य इंजि. प्रा. श्यामजी भुतडा यांनी राष्ट्रीय कृषि शिक्षण दिनानिमित्त विद्यार्थ्यांना कृषि शिक्षणाचे महत्त्व पटवून दिले. तसेच महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. एस. जी. मोरे यांनी कार्यक्रमाची सांगता व आभार प्रदर्शन केले. या कार्यक्रमास कृषि महाविद्यालयातील विद्यार्थी, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.

**सर्पराज्ञीत निसर्गार्पण**

वन्यजीव पुनर्वसन केंद्र तागडगाव येथे दिनांक १४ डिसेंबर रोजी साजरा केला जात असून सकाळी ११ ते दुपारी ४ वाजेपर्यंत आहे. अशी माहिती सर्पराज्ञीच्या संचालिका सृष्टी सोनवणे यांनी दिली.

**सर्व्हे करुन शेतकऱ्यांना**

बीड जिल्ह्यात सप्टेंबर–ऑक्टोबर दरम्यान मोठ्या प्रमाणात सततची अतिवृष्टी झाल्याने खरिपातील पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले होते. त्यावेळी जिल्ह्याचे पालकमंत्री म्हणून संपूर्ण नुकसानीचा आढावा घेत पीकविमा कंपनी व प्रशासनाची एकत्र बैठक घेऊन विमा कंपनीने प्राप्त तक्रारींच्या आधारे तातडीने सॅम्पल सर्व्हेक्षण करून घ्यावे व २५% अग्रीम विमा मंजूर करून शेतकऱ्यांना वितरित करावा, अशा सूचना केल्या होत्या. मात्र पुढे निवडणुकीची आचारसंहिता लागताच या प्रक्रियेची गती संथ झाली. त्यामुळे आता पीकविमा कंपनीने तातडीने सदर २५% अग्रीम विमा वितरित करावा याबाबत भारतीय कृषी विमा कंपनीस राज्य शासन स्तरावरून आदेश व्हावेत, अशी मागणी धनंजय मुंडे यांनी मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्री यांच्याकडे केली असून याबाबत तातडीने निर्णय घेण्याचे आश्वासन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले आहे. तामिळनाडू मध्ये ३० नोव्हेंबर दरम्यान आलेल्या फेंगल चक्री वादळाच्या परिणाम स्वरूप बीड जिल्ह्यासह महाराष्ट्रात बहुतांश ठिकाणी डिसेम्बर च्या पहिल्या आठवड्यात हलका व मध्यम स्वरूपाचा पाऊस झाला. बीड जिल्ह्यात सतत दोन ते तीन दिवस अचानक हवामान बदलून हलका व मध्यम स्वरूपाचा अवकाळी पाऊस झाला; यामुळे रब्बीतील तुरीसह खरिपातील गहु, ज्वारी, हरभरा, भाजीपाला व फळपिके आदींचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले. या नुकसानीचे देखील सॅम्पल सर्व्हे क्षण करून जिल्हा प्रशासनाकडून मदतीचे अहवाल प्राप्त केले जावेत व जिल्ह्यातील बाधित शेतकऱ्यांना आर्थिक मदत केली जावी, असेही धनंजय मुंडे यांनी आपल्या मागणी पत्रात नमूद केले असून याबाबतही तातडीने निर्णय घेण्यात येईल असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांनी म्हटले आहे.

**राहुरी–मांजरी रस्ताचा**

जोडलेला असून या रस्त्यावर मोठ मोठे खड्डे पडले असल्या कारणाने या रस्त्यावरील पुढे जाणारी वाहतूकही कमी झाली आहे.

रस्त्यावरील खड्डे बुजवण्याचा काही प्रमाणात प्रयत्न केला गेला परंतु एक दोन पावसातच रस्त्यावर टाकलेली खडी पावसात वाहून गेली अत्यंत निकृष्ट असे काम त्या रस्त्याचे झाले असून नागरिकांना व प्रवाशांना मनस्ताप सहन करावा लागत आहे राहुरी मांजरी रस्त्याच्या दुरुस्तीसाठी लवकरच पूर्व भागातील वळण मानोरी आरडगाव केंद्ळ तांदुळवाडी येथील ग्रामस्थ आंदोलनाचे शस्त्र हाती घेणार आहेत.

**स्वस्त तांदळाच्या खिचडीचे**

दर्जाच्या तांदळाची खिचडी शिजवून तहसीलदार चंद्रकांत शेळके यांच्या समोर ठेवून ग्रामस्थांनी निकृष्ट धान्य वाटप आणि स्वस्त धान्य दुकानदार यांच्या मनमानी कारभाराच्या समस्या मांडल्या.प्रशासनाचे लक्ष वेधण्यासाठी आंदोलन करण्यात आले. निवेदन तहसीलदार चंद्रकांत शेळके यांना देण्यात आले. यावेळी आंदोलनात आम आदमी पार्टी जिल्हाध्यक्ष अशोक येडे, इंटक जिल्हाध्यक्ष रामधन जमाले, रामनाथ खोड,शेख युनुस,सुदाम तांदळे,शिवशर्मा शेलार, शेख मुबीन,शेख मुस्ताक, बप्पासाहेब पवार, अंकुश परीहार,अर्जुन ससाणे,सुमन ससाणे,दैवशाला ससाणे, सुभाबाई ससाणे,बाळु साबळे, नवनाथ घोलप,शेख नदीम शेख करीम, बापुराव येडे, ईश्वर चव्हाण आदी सहभागी होते.

संपादक : **बाळासाहेब भगवान मस्के**, कार्यकारी संपादक : **सुनिल मसू डोंगरे**
हे दैनिक प्रकाशक,मुद्रक,मालक,संपादक बाळासाहेब भगवान मस्के यांनी बी.एम.प्रिंटर्स अँन्ड पब्लिकेशन, बीड, ता.जि.बीड येथे छापून दैनिक बीड पुण्यभूमी तहसीलच्यामागे, डीपी रोड बीड (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.
(अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.) न्यायालयीन वाद बीड न्यायक्षेत दुरध्वनी–०२४४२–२९९०८४,ई-मेल–beedpunyabhumi@gmail.com
Daily Beed punyabhumi hews paper owner, publisher, Edit Balasaheb Bhagwan Maske has printed at B.M. printexs, behing the tehsil, dp road (Maharashtra) 431122
Published at daily Beed Punyabhumi office, behing the tehsil, dp road, beed -431122 Phone No. (02442)299084, Email-beedpunyabhumi@gmail.com



## संजय मोरे यांच्या वतीने दिव्यांगांना मायेची ऊब

**कल्याण :** नुकत्याच पार पडलेल्या विधानसभा निवडणुकीत मिळालेल्या अद्वितीय यशाबद्दल भाजपा कल्याण पूर्व मंडळ अध्यक्ष संजय मोरे यांच्या नियोजनाखाली भाजपा दिव्यांग सेल तसेच स्वराज्य अपंग संस्था यांच्यातर्फे जागतिक दिव्यांग दिनाच्या आनुषंगाने विभागातील दिव्यागांना मायेची ऊब म्हणून ब्लँकेट तथा भेटवस्तू वाटप करण्यात आल्या. संजय मोरे यांच्या जनसंपर्क कार्यालयात आयोजित करण्यात आलेल्या या कार्यक्रमाला कल्याण पूर्वच्या नवनिर्वाचित आमदार सुलभा गायकवाड यांच्या प्रमुख उपस्थितीत दिव्यांगाना भेट वस्तूंचे वाटप करण्यात आले. यावेळी आमदार सुलभा गायकवाड यांच्यासह भाजपा कल्याण पूर्व मंडल अध्यक्ष संजय मोरे, महिला मोर्चा अध्यक्षा सविता देशमुख, दिव्यांग सेल जिल्हा सहसंयोजक मंगेश पवार, दिव्यांग सेल कल्याण पूर्व अध्यक्ष मोहन हुले, रुपेश साळुंके आदींसह बहुसंख्य दिव्यांग उपास्थित होते.

# ‘शहाड येथील नवीन पंप हाऊसचे काम दीड वर्षांत पूर्ण करावे’

## महापालिका आयुक्त सौरभ राव यांनी दिले निर्देश

◆ **ठाणे (प्रतिनिधी) :**

ठाणे, भिवंडी-निजामपूर आणि मीरा-भाईंदर महापालिका क्षेत्रास पाणीपुरवठा करणाऱ्या स्टेम प्रकल्पात ५०० दशलक्ष लिटर क्षमतेचे नवीन पंप हाऊस आणि बारा किलोमीटरची नवीन जलवाहिनी यांच्या कामाचा शुभारंभ महापालिका आयुक्त सौरभ राव यांच्या हस्ते नुकताच करण्यात आला.

मूलभूत सोयी-सुविधांचा विकास करण्यासाठी विशेष तरतुदी अंतर्गत महापालिकांना राज्य शासनाकडून अनुदान मिळते. त्या अंतर्गत, ठाणे, भिवंडी-निजामपूर मीरा-भाईंदर महापालिका क्षेत्रास पाणीपुरवठा करणाऱ्या स्टेम प्रकल्पाची पाणी उचल क्षमता वाढवण्यासाठी, नवीन पंप हाऊसचे बांधकाम, नवीन जलवाहिनी टाकणे आणि जुन्या जलवाहिनीची दुरुस्ती करणे या कामासाठी २७८ कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला. तत्कालीन मुख्यमंत्री आणि आताचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी या निधीस ऑक्टोबर २०२४ मध्ये मान्यता दिली. तांत्रिक मान्यता होऊन सुमारे तीन वर्षे प्रलंबित राहिलेल्या या प्रकल्पासाठी ठाणे महापालिका आयुक्त सौरभ राव यांनी पाठपुरावा केला.



### नवीन आणि जास्त क्षमतेचे पंप हाऊस

स्टेम कंपनीकडून सध्या ३०० दशलक्ष लीटर पाणीपुरवठा करण्यात येतो. या पाण्याचे ठाणे महापालिका भिवंडी निजामपूर महापालिका आणि मीरा-भाईंदर महापालिका तसेच जिल्हा परिषद क्षेत्रातील काही गावे यांना वितरण करण्यात येते. उल्हास नदीपात्रातून पाणी उचलण्यासाठी ३०० दशलक्ष लिटर क्षमतेचे पंप हाऊस आणि जलवाहिनी यांचे बांधकाम १९८५ मध्ये करण्यात आले. कालमानाप्रमाणे हे पंप हाऊस जुने झाले असून जलवाहिन्याही जुन्या झाल्या आहेत त्यामुळे पाणीपुरवठा करण्यात अडथळे निर्माण होतात. त्यावर मात करण्यासाठी नवीन आणि जास्त क्षमतेचे पंप हाऊस तसेच जलवाहिन्यांचे काम हाती घेण्यात आले आहे.

स्टेम अंतर्गत येणाऱ्या महापालिका क्षेत्राची वाढीव पाण्याची आवश्यकता लक्षात घेऊन नवीन पंप हाऊस आणि नवीन जलवाहिनी यांचे काम पूर्ण करण्यासाठी दोन वर्षांचा अवधी देण्यात आला असला तरी ते काम दीड वर्षांतच पूर्ण करावे. त्यामुळे या परिसराला कोणत्याही अडथळ्याशिवाय पाणीपुरवठा करणे शक्य होईल. तसेच, भविष्यात वाढीव पाणी उपलब्ध झाल्यास तेही या यंत्रणेमार्फत पुरवणे शक्य होईल, असे महापालिका आयुक्त सौरभ राव यांनी याप्रसंगी स्पष्ट केले. या शुभारंभ प्रसंगी, ठाणे महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त प्रशांत रोडे, स्टेमचे व्यवस्थापकीय संचालक संकेत घरत आदी मान्यवर उपस्थित होते.

### क्षमता वृद्धी आणि वीज बचत

नवीन पंप हाऊसमुळे पाणी उचलण्याची क्षमता तर वाढेलच. शिवाय नवीन जलवाहिनी अंथरल्यामुळे पाण्याची गळती तसेच घट कमी होईल. तसेच, सध्या नऊ पंप चालवून पाणी उचलावे लागते. नवीन व्यवस्थेत सहा पंप चालवावे लागतील. त्यामुळे विजेची मोठ्या प्रमाणात बचत होईल, असा विश्वास व्यवस्थापकीय संचालक संकेत घरत यांनी व्यक्त केला.

### कामाचे स्वरूप

- शहाड येथे उल्हास नदीच्या पात्राशेजारी ५०० दशलक्ष लिटर क्षमतेचे नवीन पंप हाऊस बांधणे.
- शहाड ते टेमघर अशी ०९ किलोमीटर अंतराची अशुद्ध पाणी वाहून देणारी जलवाहिनी अंथरणे.
- टेमघर ते माणकोली मुख्य वितरण टाकी अशी ०३ किलोमीटरची शुद्ध पाण्याची जलवाहिनी अंथरणे.

रुग्णांसाठी सिव्हील रुग्णालय आधारवड

# हिमोफिलिया ग्रस्त विद्यार्थ्यांचे अभेद्य यश!



◆ **ठाणे (प्रतिनिधी) :**

हिमोफिलिया सारखा दुर्धर आजार झाल्यावर उपचारासाठी रुग्णांची चांगलीच धावपळ होत असली, तरी ठाणे सिव्हील रुग्णालयात हिमोफिलिया रुग्णांसाठी आधारवड ठरत आहे. रुग्णालयामार्फत वेळोवेळी हिमोफिलिया इंजेक्शन रुग्णांना तत्काळ उपलब्ध होत असल्याने रुग्ण सर्वसामान्य जीवन जगत आहे. त्यामुळे हिमोफिलिया ग्रस्त शालेय महाविद्यालयीन विद्यार्थ्यांनी घवघवीत यश संपादन केल्यामुळे हिमोफिलिया फेडरेशनच्या माध्यमातून सिव्हील रुग्णालयातर्फे विद्यार्थ्यांची पाठ थोपटली आहे. अनुवांशिक आजारामध्ये गणंना होणाऱ्या हिमोफिलिया रुग्णांना वेळेत उपचार मिळणे खूप महत्त्वाचे असते. या आजारात रक्त गोठण्याची प्रक्रिया मंदावलेली असते. त्यामुळे अनेकदा हिमोफिलिया व्यक्तीला जखम झाली अथवा अवयवावर अधिक ताण पडल्यावर रक्त थांबण्याचे नाव घेत नाही. त्यावेळी हिमोफिलिया रुग्णांना अधिक त्रास होतो. मात्र या दरम्यान हिमोफिलिया इंजेक्शन घेणे खूप महत्त्वाचे आहे. ही इंजेक्शन सर्वसामान्यांसाठी खर्चिक असली, तरी सिव्हील रुग्णालयात ही इंजेक्शन मोफत मिळत आहेत आणि वेळेवर उपलब्ध होत असल्याची माहिती हिमोफिलिया फेडरेशनचे उपाध्यक्ष रामू गडकर यांनी दिली.

> हिमोफिलिया हा एक दुर्मिळ, अनुवांशिक रक्त विकार आहे. वेळच्यावेळी औषध घेणे गरजेचे आहे. काही वेळा रक्तस्त्राव वाढत असल्यास तत्काळ इंजेक्शन घेणे क्रम प्राप्त आहे. सिव्हील रुग्णालय ही इंजेक्शन तत्काळ कशी उपलब्ध होतील यासाठी अग्रक्रम दिला जातो. हिमोफिलिया ग्रस्त विद्यार्थ्यांचे शिक्षणातील हुशारी बघून कौतुक करावे तेवढे थोडे आहे.
>
> **- डॉ. कैलास पवार** (जिल्हा शल्य चिकित्सक ठाणे)

> ठाणे, पालघर, रायगड जिल्ह्यांत हिमोफिलियाचे साधारण ७०० ते ८०० रुग्ण आहेत. हिमोफिलिया फेडरेशनच्या माध्यमातून उपचार घेणाऱ्या रुग्णांना सिव्हील रुग्णालयात हिमोफिलिया इंजेक्शन उपलब्ध करून दिले जाते. हिमोफिलिया ग्रस्त विद्यार्थ्यांनी दहावी, बारावी आणि महाविद्यालयीन विद्यार्थ्यांनी मिळवलेले यश खूप मोठ आहे. सिव्हील रुग्णालयाचे जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. कैलास पवार यांच्या हस्ते विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र देऊन कौतुक करण्यात आले.
>
> **- रामू गडकर** (उपाध्यक्ष, हिमोफिलिया फेडरेशन, बदलापूर)

### विद्यार्थ्यांची प्रतिक्रिया

हिमोफिलिया ग्रस्त विद्यार्थ्यांना शारीरिक नोकऱ्या करता येत नसल्यामुळे त्यांना सुशिक्षित आणि चांगल्या नोकऱ्या मिळवण्यासाठी अभ्यास खूप महत्त्वाचा आहे. आणि वेळोवेळी ठाण्यातील सिव्हील रुग्णालय आम्हाला औषधोपचार आणि इंजेक्शन उपलब्ध होते. परीक्षेच्या काळात देखील आम्हाला वेळेत इंजेक्शन मिळाले असल्याचे विद्यार्थ्यांनी सांगितले.

## वेचक

### केडीएमसी क्षेत्रातील प्रकल्प कागदावरच

**डोंबिवली :** कल्याण-डोंबिवली महापालिकेच्या क्षेत्रात अनेक प्रकल्प जाहीर झाले. मात्र या कामाला गती प्राप्त होतांना दिसत नाही. मेट्रो ५ प्रकल्प हा २०१७ ला जाहीर झाला असून सदर प्रकल्प होणार आहे का हा प्रश्न उपस्थित होत आहे. रिंगरूट त्यातही अनेक अडचणी निर्माण होताना दिसत आहे. या प्रकल्पावर अनेकदा चर्चा झाल्या; परंतु फक्त कागदावर आराखडे झाले. असे अनेक प्रकारचे प्रकल्प जाहीर केले गेले आहेत पण प्रत्यक्षात फक्त चर्चाच सुरू आहे. यामुळे कल्याण-डोंबिवली मध्ये घर घेण्यासाठी पसंती न देता ते ठाणे, अंबरनाथ, बदलापूर या ठिकाणांना पसंती देताना नागरिक दिसत आहे.

### कल्याणात दिवसाढवळ्या चाकूने हल्ला

**कल्याण :** कल्याण येथील वल्लीपिर भरचौकात एका तरुणावर चाकूने हल्ला झाल्याची खळबळजनक घटना घडली. ही घटना परिसरातील सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद झाली असून यामुळे नागरिकांमध्ये भीतीचे




वातावरण निर्माण झाले आहे. पोलीस ठाण्यातून मिळालेल्या माहितीनुसार, अरुण तिवारी (आरोपी) याने जुन्या वादातून या हल्ल्याचे कृत्य केले आहे. पीडित तरुणावर चाकूने वार करण्यात आले असून, त्याला तातडीने रुग्णालयात हलवण्यात आले आहे. सुदैवाने, त्याची प्रकृती स्थिर असल्याचे समजते. बाजारपेठ पोलीस ठाण्याच्या अधिकाऱ्यांनी आरोपी अरुण तिवारी याला तातडीने ताब्यात घेतले आहे. या घटनेबाबत गुन्हा दाखल करण्यात आला असून, पुढील तपास सुरू आहे. सीसीटीव्ही फुटेजच्या आधारे हल्ल्याचे कारण स्पष्ट करण्याचा प्रयत्न केला जात आहे. बाजारपेठ पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस अधिकारी घटनास्थळी पोहोचून तपासाची दिशा आखत आहेत.

### शिवसेनेचे रघुनाथ मोरे यांचे निधन



**ठाणे :** शिवसेनेचे माजी ठाणे जिल्हाप्रमुख रघुनाथ मोरे यांचे शनिवारी निधन झाले. शिवसेनेचे दिवंगत ठाणे जिल्हा प्रमुख आनंद दिघे यांचे अत्यंत जवळचे सहकारी म्हणून मोरे यांची ओळख होती. आनंद दिघे यांच्या निधनानंतर त्यांनी जिल्हाप्रमुख पदाची जबाबदारी सांभाळली होती. शिवसेनेच्या प्रत्येक आंदोलनात ते सक्रिय असायचे; परंतु जिल्हाप्रमुख पदावर असतानाच त्यांचा अपघात झाला होता. त्यांना मोठी दुखापत झाली होती. तेव्हापासून ते राजकारणापासून अलिप्त होते. काही दिवसांपूर्वीच रघुनाथ मोरे यांचा मुलगा मिलिंद यांचा विरार येथील एका रिसॉर्टमध्ये हृदयविकाराच्या झटक्याने मृत्यू झाला होता. तसेच रघुनाथ मोरे यांच्या पश्चात त्यांचे भाऊ, पुतणे, मुली, नातवंड असा परिवार आहे.

### संत संताजी जगनाडे यांना नमुंमपा मुख्यालयात वाहिली आदरांजली




**नवी मुंबई :** नवी मुंबई महानगरपालिकेच्या वतीने संत संताजी जगनाडे महाराज जयंतीनिमित्त महापालिका मुख्यालयातील ॲम्फिथिएटर येथे प्रशासन विभागाचे उपआयुक्त शरद पवार यांच्या शुभहस्ते प्रतिमापूजन संपन्न झाले. संत तुकाराम महाराजांच्या अभंग गाथेचे लेखनिक तसेच तसेच त्यांच्या भजनातील श्रेष्ठ टाळकरी असलेल्या संत संताजी जगनाडे महाराजांनी 'तेलसिंधु', 'शंकरदीपिका', 'योगाची वाट' असे स्वतंत्र ग्रंथलेखनही केले आहे. त्यांच्या 'तेलसिंधु' ग्रंथातून त्यांनी तेलाच्या निर्मितीचा व व्यवसायाचा आध्यात्मिक संबंध दर्शवित अलौकिक प्रतिभेचे दर्शन घडविले आहे. त्यांच्या जयंतीनिमित्त अभिवादन करण्यासाठी नमुंमपा अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.

### ठाण्यात मोबाईल चोरट्यांचा सुळसुळाट

**ठाणे :** ठाण्यात मोबाईल चोरट्यांचा सुळसुळाट पसरला आहे. चोरटे रेल्वेमधील प्रवाशांचे मोबाईल गर्दीचा फायदा घेऊन लांबविण्याच्या अनेक घटनांनंतर रेल्वे



पोलीस प्रशासनाने कडक कारवाईचा बडगा उगारल्याने आता चोरट्यांनी आपला मोर्चा खासगी, टीएमटी बसेस आणि रिक्षातून प्रवास करणार्या प्रवाशांना टार्गेट केल्याचे चित्र आहे. अशी घटना चितळसर पोलीस ठाण्याच्या हद्दीत घडली. रिक्षातून प्रवास करणाऱ्या फिर्यादी रुपाली नितिन भोये या डॉक्टरचा मोबाईल दुचाकीवरील चोरट्यांनी हिसकावून घेत धूम ठोकली. याबाबत चितळसर पोलीस ठाण्यात अज्ञात मोबाईल चोरट्याच्या विरोधात गुन्हा नोंदविला असून पोलीस अधिक तपास करीत आहेत.

## अंबरनाथमध्ये तीन अल्पवयींवर अत्याचार

### उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांनी घेतली गंभीर दखल

◆ **अंबरनाथ (वार्ताहर) :**

बदलापूरमधील घटना अजूनही लोकांना विस्मरण झालेली नसताना अंबरनाथमध्ये संतापजनक प्रकार घडला आहे. वांद्रापाडा परिसरात अंबरनाथ, (जि.ठाणे) येथील सेवाभावी संस्थेच्या शाळेत शिक्षकांने तीन अल्पवयीन मुलांवर लैंगिक अत्याचार केल्याच्या घटनेचा प्रकार घडला आहे. या प्रकरणाची सत्यस्थिती उपसभापती विधानपरिषद कार्यालयातील अधिकाऱ्यांनी जाणून घेतली व त्याबाबत डॉ. नीलम गोऱ्हे यांना सदर माहिती दिली. याविषयी अंबरनाथ पोलीस स्टेशनमध्ये एफआयआर नोंद झाली आहे. हे प्रकरण अतिशय गंभीर आहे. त्यामुळे डॉ. नीलम गोऱ्हे या पीडित विद्यार्थ्यांच्या पाठीशी ठामपणे उभ्या आहेत हे त्यांनी लेखी निवेदनाद्वारे ठाणे पोलीस आयुक्त यांना



कळवले आहे.

तसेच निवेदनामध्ये विशेष सूचनाही डॉ. नीलम गोऱ्हे यांनी दिल्या आहेत. आरोपी शिक्षकाची जामीन मंजूर होणार नाही याबाबत पोलीसांनी न्यायालयात प्रभावी युक्तीवाद करावा. उक्त शाळेतील सीसीटीव्ही पूर्ण सर्व्हेशन पोलीसांनी करावे, सीसीटीव्ही न्यायालयाच्या निदर्शनास आणून दयावी. शाळेतील शिक्षक आरोपीची व्यवस्थापनाने नियुक्ती करताना या शिक्षकांवर कोणत्या जबाबदारी दिल्या होत्या याची माहिती घ्यावी.

तसेच, पालक व विद्यार्थ्यांचे समूपदेशन करावे. पोलीस तपासाची जास्तीत जास्त माहिती मिळण्याबाबत पोलिसांनी या शाळेतील इतर शिक्षकांचीही विचारपूस करावी. हा खटला फास्ट ट्रॅक कोर्टात चालविण्याकरीता न्यायालयास विनंती करावी. अत्याचार झालेल्या विद्यार्थ्यांचे नाव समाजमाध्यमात येऊ नये याची काळजी घ्यावी.

या घटनेचे गांभीर्य लक्षात घेता पोलीस उपआयुक्त दर्जाचा अधिकारी नेमावा. या घटनेची संपूर्ण चौकशी व प्रभावी पर्यवेक्षण वरिष्ठ पोलीस अधिकारी यांच्यामार्फत करावे. अशा सूचना डॉ. नीलम गोऱ्हे उपसभापती विधान परिषद यांनी ठाणे पोलीस आयुक्त यांना दिल्या आहेत.

## आठ वर्षीय मुलाचा भटक्या कुत्र्याने घेतला चावा

**कल्याण (प्रतिनिधी) :** टिवाळ्यात शुक्रवारी रात्री फिरस्त्या महिलेचे भटक्या मोकाट कुत्र्यांनी लचके तोडून गंभीर जखमी केल्याच्या दुसऱ्याच दिवशी कल्याण पश्चिमेतील बेतूरकर पाडा परिसरात भटक्या मोकाट कुत्र्याने ८ वर्षीय मुलाच्या ओठांवर तसेच गुप्तांगाचा चावा घेतल्याने गंभीर जखमी झाल्याची घटना शनिवारी संध्याकाळी घडल्याने मनपा क्षेत्रातील भटक्या मोकाट कुत्र्याचा प्रश्न ऐरणीवर आला असून भटक्या मोकाट कुत्र्यांची दशहत थांबणार कधी असा सवाल उभा ठाकला आहे.

कल्याण पश्चिमेतील बेतूरकर पाडा शिवाजी नगर परिसरात राहणारे पप्पू श्रीनिवास हे दाणा मार्केट येथे काम करतात. अधीच हालखीची परिस्थिती अशातच मोहिंदर सिंग काबुल सिंग शाळेत इयत्ता दुसरीत शिकत असणारा त्यांचा ८ वर्षीय मुलगा अथर्व हा शिकवणीहून घरी परत येत असताना भटक्या मोकाट कुत्र्याने त्याच्यावर हल्ला करीत झेप घेत चावा घेतला. या घटनेत मुलगा गंभीर जखमी झाला. त्याला रुक्मिणीबाई रुग्णालयात नेले असता पुढील उपचारार्थ सायन येथे नेण्यात येऊन उपाचाराअंती घरी सोडले.

## फडके मैदान लग्नांसाठी न देण्याबाबत आयुक्तांना साकडे

◆ **कल्याण (प्रतिनिधी) :**

कल्याण पश्चिमेतील वासुदेव बळवंत फडके मैदान या खेळाच्या मैदानात कोणत्याही लग्न, जत्रा यांना परवानगी देऊ नये अशी मागणी माजी नगरसेवक, शिवसेना उपशहर प्रमुख मोहन उगले यांनी पत्राद्वारे केडीएमसी आयुक्तांकडे केली आहे.

कल्याण-डोंबिवली मनपाच्या फडके मैदानात लग्न, इतर समारंभ साजरे करणारे लोक संपूर्ण मैदान घाण करून ठेवतात. या ठिकाणी बगीचा देखील असून त्या आनुषंगाने सकाळ-संध्याकाळ क्रीडाप्रेमी नागरिक, ज्येष्ठ नागरिक, लहान मुले मैदानात खेळाचा आनंद घेत असतात; परंतु त्या ठिकाणी लग्न, जत्रा, इतर कार्यक्रम करणारे लोक संपूर्ण मैदान घाण करून ठेवतात. आजूबाजूच्या नागरिकांना त्याचा मोठा त्रास होतो. यासर्व गोष्टींचा विचार करता हे मैदान कोणालाही भाड्याने देऊ नये अशा आशायाचे पत्र शिवसेना उपशर प्रमुख मोहन उगले यांनी कल्याण-डोंबिवली मनपा आयुक्त यांना दिले आहे.

## पाटकर प्लाझा वाहनतळ सांडपाण्याने तुंबले

◆ **डोंबिवली (वार्ताहर) :**

डोंबिवली येथील पूर्व रेल्वे स्थानक भागातील बाजीप्रभू चौकातील पाटकर प्लाझामधील पालिकेचे तळघरातील रिकामे वाहनतळ गेल्या काही दिवसांपासून सांडपाण्याने तुंबले आहे. या तुंबलेल्या पाण्याला दुर्गंधी आणि त्यावर डास निर्माण झाल्याने या भागात व्यवसाय करणारे व्यापारी त्रस्त आहेत. याप्रकरणी आम्ही पालिकेला पत्र दिली आहेत, असे येथील व्यापाऱ्यांनी सांगितले.

कल्याण डोंबिवली पालिकेची बाजीप्रभू चौकातील पाटकर प्लाझामध्ये तळघरात वाहनतळाची जागा आहे. तळ आणि पहिला मजला अशा



द्विस्तरीय वाहनतळाची येथे व्यवस्था आहे. ही वाहनतळे सुरू करण्यात यावीत म्हणून मागील सहा वर्षांपासून उपप्रादेशिक परिवहन अधिकारी, वाहतूक अधिकारी, रिक्षा संघटना प्रयत्नशील आहेत. यापूर्वी सार्वजनिक बांधकाम मंत्री रवींद्र चव्हाण यांनी पुढाकार घेऊन हे वाहनतळ सुरू करण्याचा प्रयत्न केला होता. इतर राजकीय अडथळ्यांमुळे हा विषयानंतर मागे पडला. पाटकर प्लाझामधील तळघरातील रिकाम्या वाहनतळाच्या जागेत गेल्या काही दिवसांपासून दोन ते तीन फूट सांडपाणी तुंबले आहे. हे तुंबलेले पाणी वाहून जाण्यास मार्गिका नाही. अनेक दिवसांच्या या तुंबलेल्या सांडपाण्यामुळे या भागात दुर्गंधी पसरली आहे. त्यावर डास तयार झाले आहेत. चिमणी गल्ली, पाटकर प्लाझामध्ये व्यवसाय करणाऱ्या व्यापाऱ्यांना त्याचा त्रास होत आहे. रेल्वे स्थानकाकडे जाणाऱ्या प्रवाशांनाही त्याचा त्रास होतो. या वाहनतळाच्या तळघरातील सांडपाणी काढून हे वाहनतळ पूर्ण क्षमतेने सुरू करण्यासाठी आयुक्त डॉ. इंदुराणी जाखड यांनी पुढाकार घ्यावा, अशी मागणी नागरिक, व्यापाऱ्यांकडून करण्यात येत आहे.



बांगलादेशातील हिंदू समाजावर होणारे अत्याचार थांबावेत इस्कॉनच्या साधूंची तत्काळ मुक्तता व्हावी या मागणीसाठी सकल हिंदू समाजातर्फे ठाण्यात मूक मोर्चाचे आयोजन करण्यात आले होते. ठाणे महापालिकेपासून मोर्चाला सुरुवात होऊन शिवाजी मैदान, जांभळी नाका येथे मोर्चाची सांगता झाली.



मुरबाडमध्ये सकल हिंदू समाजाच्या वतीने बांगलादेशातील हिंदू अल्पसंख्यांकांवर होणाऱ्या अन्यायाविरोधात मुकमोर्चा व मानवी साखळी काढण्यात आली.

अनेक शाळांचा उपक्रमात सहभाग

## ‘सिटी कल्याण निसर्गमेळा’ला विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

◆ **कल्याण (प्रतिनिधी) :**

पर्यावरण दक्षता मंडळ, कल्याण, रोटरी क्लब ऑफ कल्याण सिटी आणि नॅशनल उर्दू हायस्कूल यांच्या संयुक्त विद्यमाने "सिटी कल्याण निसर्गमेळा २०२४" चे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये विविध शाळेतील ७ वी, ८ वी च्या विद्यार्थ्यांसाठी एकूण ८ वेगवेगळ्या प्रकारच्या स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धांमागचे मुख्य उद्दिष्ट पर्यावरण शिक्षण देणे व त्याच बरोबर जनजागृती घडवणे हा होता. ३ डिसेंबर भोपाळ वायू दुर्घटना या दिवसाची स्मृती प्रीत्यर्थ या उपक्रमात



महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण बोर्ड यांच्या सहकार्याने हवा प्रदूषण तपासणीची मोबाइल व्हॅन उपस्थित विद्यार्थ्यांना माहिती देण्यासाठी उपलब्ध करून देण्यात आली. तसेच जागतिक मृदा दिनाचे औचित्य साधून विद्यार्थ्यांसाठी मातीपासून विविध आकाराचे भांडे बनवण्याचे प्रशिक्षण देण्यात आले.

या निसर्गमेळ्यामध्ये झाडे ओळखा स्पर्धा, निसर्ग छायाचित्रण स्पर्धा, भित्तिचित्र स्पर्धा, इंधन विरहित पाककृती, कापडी पिशवीवर चित्र काढणे, टाकाऊ पासून टिकाऊ, पर्यावरण गीत आणि पथनाट्य अशा एकूण ८ स्पर्धांचा समावेश होता. सर्व स्पर्धांसाठी तज्ज्ञ व मान्यवर परिक्षकांचे सहकार्य लाभले. कल्याण-डोंबिवली परिसरातील १४ तज्ज्ञ मंडळींनी या कार्यात मोलाचे सहकार्य केले. रोटरी क्लब ऑफ कल्याण सिटीतर्फे सर्व विजेत्या स्पर्धकांना पुरस्कृत करण्यात आले तसेच सहभागी विद्यार्थ्यांना सहभाग प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले. पर्यावरण दक्षता मंडळातर्फे पर्यावरण प्रदर्शनी आणि पक्षी छायाचित्रांचे प्रदर्शन सादर करण्यात आली. सुभेदार वाडा शाळा, शारदा मंदिर शाळा, शिशुविकास बेतूरकर पाडा, आंबेडकर रोड, गजानन विद्यालय प्राथमिक आणि माध्यमिक, के. सी. गांधी शाळा, बालक मंदिर इंग्लिश, वाणी विद्याशाळा, गायत्री माध्यमिक शाळा, नूतन ज्ञान मंदिर, आश्रय फाऊंडेशन काळसेकर हायस्कूल, ओल्ड बॉइज असो. इंग्लिश शाळा, मोहमदीया शाळा, नरेंद्र कान्वेंट स्कूल, स. ब. दिव्य शाळा, अभिनव विद्यालय, नॅशनल उर्दू हायस्कूल आदी शाळांसह एकूण २० शाळांमधून अनेक विद्यार्थी सहभागी झाले होते. तसेच पर्यावरण दक्षता मंडळातर्फे समीक्षा चव्हाण, हेमांगी सामंत, आदित्य कदम यांनी या कार्यक्रमाचे नियोजन केले होते.

## निवडणुकीत सहकार्य करणाऱ्या विद्यार्थ्यांचा सन्मान

◆ **कल्याण (प्रतिनिधी):**

नुकत्याच पार पडलेल्या विधानसभा सार्वत्रिक निवडणुकीमध्ये बंदोबस्त कामी मनुष्यबळ अपुरे पडत असल्याने ही उणीव लक्षात घेऊन परिमंडल ३ चे पोलीस उपायुक्त अतुल झेंडे यांनी परिमंडळ तीन मधील सर्व पोलीस स्टेशनला कॉलेजचे एनसीसी व एनएसएसचे विद्यार्थी यांची विशेष पोलीस अधिकारी म्हणून मदत घेण्याबाबत सुचविले होते.

त्याप्रमाणे खडकपाडा पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक डॉ. अमरनाथ वाघमोडे यांनी के. एम. अग्रवाल कॉलेज गांधारी व एल. डी. सोनवणे कॉलेज वाडेघर कल्याण यांच्याशी संपर्क साधून



त्यांना निवडणूक बंदोबस कामी एनसीसी, एनएसएस विद्यार्थी मदतीस देण्यासाठी आवाहन केले. त्याप्रमाणे अग्रवाल कॉलेजचे एनसीसी २५ विद्यार्थी व सोनवणे कॉलेजचे एनएसएसचे २५ विद्यार्थी उपलब्ध झाले होते. या विद्यार्थ्यांनी मतदान केंद्रावर पोलिसांच्या सूचनेप्रमाणे नागरिकांच्या रांगा लावणे, ज्येष्ठ नागरिकांना मदत करणे असे महत्त्वाची कामे केल्याने पोलीस विभागांना त्यांची फार मोठी मदत झाली.

याची जाणीव ठेवून पोलीस उपयुक्त परिमंडळ ३ कल्याण यांनी अशा सर्व विशेष पोलीस अधिकारी यांचा व निवडणूक काळात मदत करणारे इतर पोलीस मित्र यांचा प्रशस्तीपत्र देऊन सन्मान करण्याचे आदेश दिले होते.

दररोजच्या घडामोडीसाठी वाचत रहा... पुण्यभूमी

**सुविचार :** स्वतःवर विश्वास ठेवा, कारण आत्मविश्वासाने जग जिंकता येते.

## मंत्रिपदाची मारामारी...!

अगदी दणकट बहुमताने सत्तेत आलेल्या महायुतीसमोर आता राजकीय समस्या फारशा राहिलेल्या नाहीत. अर्थात काही अनपेक्षित, धक्कादायक असे काही घडले नाही तरच अलीकडील काळात महाराष्ट्रातील राजकारणाचा काहीच भरोसा देता येत नाही; परंतु यावेळी असे काही अघटित घडण्याची शक्यता खूप कमी आहे. मागच्यावेळी सगळ्याच पक्षाच्या संख्याबळाने अशा अनेक शक्यतांना वाव ठेवला होता आणि त्याचा प्रत्ययदेखील मागच्या पाच वर्षात वारंवार आला. यावेळी संख्याबळाचे गणित असे काही फसले आहे की कोणत्याही पक्षाला कोणतीही हालचाल करण्यास वाव उरलेला नाही. बहुमत कोणत्याही एका पक्षाला मिळालेले नसले तरी भाजप इतर पाचपैकी कोणत्याही एका पक्षाच्या सहाय्याने बहुमताचा आकडा गाठू शकतो अशी परिस्थिती आहे. त्यामुळे सत्तेच्या सगळया दोऱ्या भाजपच्या हातात आहे. इच्छा असूनही एकनाथ शिंदे यांना यावेळी फारसे ताणून धरता आले नाही, तर अजित पवारांनी परिस्थितीला शरण जात आधीच भाजपचे नेतृत्व मान्य केले आहे. एकूणच सध्या कोणत्याही पक्षाकडून सरकारला कोणताही धोका नसल्यामुळे यावेळी मंत्रिमंडळ गठन करताना तिन्ही पक्षांच्या नेत्यांना आपल्या मर्जीनुसार आपले सहकारी निवडण्याची मुभा आहे. कुणाच्या नाराजीची काळजी करण्याचे आता काही कारण नाही. नागपूरच्या हिवाळी अधिवेशनापूर्वी मंत्रिमंडळाचा विस्तार होणार आहे किंवा तो करावा लागणार आहे. साधारणपणे मंत्रिमंडळाचा विस्तार करताना काही जागा मुद्दामहून रिक्त ठेवल्या जातात. त्या रिक्त जागांच्या जोरावर मंत्रिमंडळात स्थान मिळू न शकलेल्या नेत्यांची समजूत काढली जाते. यावेळी तसे काही होईल का हे लवकरच कळेल. कदाचित या पहिल्या विस्तारात सगळयाच जागा भरल्या जाणार नाहीत, त्यामागे राजकीय कारण नक्कीच नसेल. होणारी निवड अधिक योग्य, अचूक आणि सरकारच्या कार्यक्षमतेला न्याय देणारी असावी, असा प्रयत्न तिन्ही नेते करतील. त्या दृष्टीने आपल्या सहकाऱ्यांची निवड करण्यासाठी या तिन्ही नेत्यांकडे सध्या तरी पुरेसा वेळ नसावा असे दिसते. शिवाय मंत्रिपदासाठी निवडलेल्या सगळया नावांना दिल्लीतील पक्षश्रेष्ठींची मंजुरीदेखील आवश्यक ठरेल. ही मंजुरी केवळ भाजपच्या मंत्र्यांपुरती मर्यादित नसेल, भाजप श्रेष्ठी आपल्या सहकारी पक्षांमधील कोणत्या नेत्याला मंत्री केले जात आहे यावरही नक्कीच लक्ष ठेवतील. त्यामुळे या सगळयासाठी काही वेळ निश्चित लागणार आहे. सध्या तितका वेळ उपलब्ध असल्यामुळे काही मोजक्या आणि निर्विवाद लोकांना त्यांच्या ज्येष्ठतेच्या आधारावर त्यांच्या पक्षाकडून स्थान दिले जाईल आणि मंत्रिमंडळाचा उर्वरित विस्तार नागपूरचे हिवाळी अधिवेशन झाल्यानंतर केला जाण्याची शक्यता अधिक आहे. त्यानंतरही मंत्रिमंडळाचा पूर्ण विस्तार केला जाईलच याची शाश्वती नाही. तिन्ही पक्षाच्या कोट्यातील काही जागा रिक्त ठेवल्या जातील. कदाचित राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका झाल्यानंतर महाविकास आघाडीतील काही पक्षांमध्ये फूट पडण्याची किंवा फूट पाडली जाण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्या परिस्थितीत या फुटीरांना सामावून घेण्यासाठी प्रलोभन म्हणून काही जागा मंत्रिमंडळात रिक्त ठेवल्या जाण्याची शक्यता आहे. अर्थात यावेळी महायुतीला अन्य कोणत्याही पक्षाच्या मदतीची गरज नाही; परंतु राज्यातील विरोधक पूर्णपणे नेस्तनाबूत करण्यासाठी महायुतीकडून विरोधी पक्षांना अस्थिर करण्याचे काम केले जाऊ शकते. या सगळया पृष्ठभूमीवर मंत्रिमंडळात तिन्ही पक्षांकडून कोणाला स्थान दिले जाते याची उत्सुकता नक्कीच आहे. सरकारच्या स्थिरतेची ग्वाही आणि त्यामुळे नेत्यांना मंत्रिमंडळातील आपले सहकारी निवडण्याची मिळालेली मुभा लक्षात घेता मंत्रिपदासाठी इच्छुक असलेल्या नेत्यांचा जीव टांगणीला लागल्याचे दिसते. या सगळया इच्छुकांमध्ये नक्कीच अस्वस्थता आहे. अगदी ज्येष्ठ म्हणविले जाणारे नेते देखील यावेळी अस्वस्थ असल्याचे दिसते. यावेळी मंत्रिमंडळात नंबर लागला नाही तर कदाचित पाच वर्षे आपल्याला केवळ प्रतीक्षाच करावी लागेल या जाणिवेमुळे अनेक अस्वस्थ नेत्यांनी आपल्या नेत्यांचे उंबरे झिजवायला सुरुवात केली आहे. त्यातच तिन्ही वरिष्ठ नेत्यांनी यावेळी नव्या चेहऱ्यांना संधी दिली जाणार असल्याचे संकेत दिल्याने ही अस्वस्थता अधिकच वाढलेली आहे.

## ठाकरे बंधुपुढील आव्हान...!

या विधानसभा निवडणुकीने राज्यातील अनेक पक्षांसमोर मोठे आव्हान उभे केले आहे. हे आव्हान जसे सध्या सत्तेत असलेल्या अजित पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेस आणि एकनाथ शिंदेंच्या शिवसेनेपुढे आहे, तसेच महाआघाडीतील उद्धव ठाकरे यांच्या पुढेदेखील आहे. उद्धव ठाकरेंसोबतच राज ठाकरेंनाही यापुढे आपली वाटचाल नेमकी कोणत्या दिशेने आणि कोणाच्या संगतीने की स्वतंत्रपणे करायची हे निश्चित करण्याचे आव्हान आहे. उद्धव ठाकरेंनी आपण पुन्हा एकदा हिंदुत्वाच्या वाटेवर परतत असल्याचे स्पष्ट संकेत दिले आहेत; परंतु त्यांना हिंदुत्वाची भूमिका मांडताना महाविकास आघाडीत आपले नेमके स्थान काय असेल याचाही विचार करावा लागेल. उद्धव ठाकरेंच्या हिंदुत्वाच्या भूमिकेला काँग्रेसचे समर्थन मिळणे कठीणच दिसते. महाविकास आघाडीतील समाजवादी पक्षाने तर आत्ताच या आघाडीपासून फारकत घेतली आहे, त्यामागे उद्धव ठाकरेंची उघड हिंदुत्वाची भूमिका हे कारण आहेच. उद्या उद्धव ठाकरे गट महाविकास आघाडीतून बाहेर पडला तर आपली स्वतंत्र राजकीय ताकद उभी करण्यासाठी या गटाला खूप मेहनत घ्यावी लागेल. एकीकडे भाजप आणि दुसरीकडे एकनाथ शिंदे यांची शिवसेना अशा दुहेरी आव्हानांना तोंड देताना उद्धव ठाकरेंची कसोटीच लागेल. राज ठाकरे तर यावेळी कधी नव्हे अशा द्विधा मनःस्थितीत सापडल्याचे दिसतात. विधानसभा निवडणुकीत त्यांनी भाजपला पाठिंबा दिला होता; परंतु अनेक ठिकाणी भाजपच्या विरोधातही त्यांनी उमेदवार उभे केले होते. आपले दोन चार आमदार निवडून आले तर पक्षाची मान्यता आणि प्रतिष्ठा टिकून राहील हा त्यांचा आशावाद होता; परंतु तसे घडले नाही. आता यापुढे पुन्हा तशीच स्वतंत्रपणे वाटचाल करायची की हिंदुत्वाच्या मुद्यावर भाजपसोबत आघाडी करीत महायुतीत सामील व्हायचे याचा निर्णय राज ठाकरेंना करावा लागेल. स्वतंत्रपणे लढून या पक्षाच्या हाती फारसे काही लागत नाही हे वारंवार सिद्ध झाले आहे. त्यामुळे भाजपचा आधार घेणे ही त्यांची आता कदाचित राजकीय मजबुरी असेल. एकूणच या निवडणुकीने ठाकरे बंधूंसमोर समोर नवे आव्हान उभे केले आहे असे म्हणता येईल.

### भाष्य

# निकालानंतरचे नवे सरकार, विरोधक आणि नव्या जाणिवा!

विकास देविदास भोवते
9665381265

शेवटी राज्यात देवेंद्र पर्व सुरू झालेच..शपथविधी आधी राज्यात जो सत्ता प्रमुखपदीचा गोंधळ चालू होता त्याला आता कुठेतरी पूर्णविराम मिळालाय. गत पंचवार्षिकमध्ये जी राजकीय उलथापालथ राज्याने बघितली ती प्रतिगामी होती. परिणामी राज्याचे आर्थिक, सामाजिक आणि सांस्कृतिक नुकसान तर झालेलेच आहे त्याबरोबरच राज्याच्या राजकारणात आलेले कमालीच्या द्वेषाचे, सूडाचे दिवस संपतील का हा प्रश्न आहे. आता विरोधी पक्ष राज्यात राहिला नसल्याने किंबहुना तो संपवलेला असल्याने (मित्रपक्षही नियंत्रणात असल्याने) तसेच कधी नव्हे ते बहुमत मिळाल्याने सत्ता पक्षाला आता आगामी पाच वर्षांत राज्याच्या सर्वांगीण प्रगतीचा आलेख उंचावायला वाव आहे. त्याचवेळी युतीला आलेले हे अच्छे दिन राज्याच्या वाट्याला येतील का, तसेच एका पक्षाला मिळालेले भव्य बहुमत स्वैराचार माजवेल का, या प्रश्नांची उत्तरे ही काळाच्या गर्भात लपलेली जरी असली, तरी मुख्यमंत्र्यांच्या मुलाखतीत आलेले सौहार्द, विकास, योजना यांचे मुद्दे आगामी सरकारची दिशा प्रस्तूत करतात. त्याचवेळी आरक्षण, बेरोजगारी, महागाई, शेतकरी, गरिबी आदी मुद्दे सरकारला स्वस्थ बसू देणार नाहीत किंबहुना सरकार आदी मुद्यांबाबत गंभीर असेल, अशी अपेक्षा ठेवायला हरकत नाही. असे असले तरी राज्याला (संख्याबळ लक्षात घेता) विरोधी पक्ष नसणे हे लोकशाहीकरिता घातक होऊ शकते. लोकसभेच्या निकालानंतर राज्यात जे काही झाले..न झाले..त्याचा परिणाम म्हणजे विधानसभेच्या निवडणुकीचा निकाल! म्हणूनच दरम्यानच्या काळाचा मागोवा घेणे महत्त्वाचे वाटते.

लोकसभेच्या निकालानंतर महाराष्ट्रात महाविकास आघाडीचा दबदबा दिसून आला, तशाच त्यांच्यातील उणिवा, अतिआत्मविश्वास समोर आल्यात. त्याचवेळी महायुती मात्र झालेल्या चुकांतून शिकताना दिसली. लोकप्रिय योजना आखल्या गेल्या, आणल्या गेल्या आणि त्यांच्या आणि हिंदुत्वाच्या पाठबळावरच ही निवडणूक लढल्या गेली. दुसरीकडे आघाडीचे मराठी अस्मितेच्या मुद्याशिवाय (त्या त्या विभागातील स्थानिक मुद्दे सोडल्यास) दुसरे अन्य मुद्दे लोकांना आपल्याकडे खेचू शकले नाहीत. त्याचबरोबर प्रतिपक्ष युतीपेक्षा साधनांनी, प्रचारानी कमी पडला. त्यामुळे विविध भागांत विविध स्थानिक मुद्दे युतीच्या विरोधात असतानाही आघाडी अपयशी ठरली. जरांगे घटक सर्वस्वी निष्प्रभ ठरला. अदानी घटकाचा जोर मुंबई (खास करून धारावी) पर्यंत मर्यादित वाटला. शेतकऱ्यांचा प्रश्न हा निरुत्तरीत राहिला. युतीकडून लाडक्या बहिणीचे मार्केटिंग करण्यात आले, सूक्ष्म स्तरावर विविध मतदारसंघाची पद्धतशीरपणे व्यूहरचना आखल्या गेली. सभांचा धडाका लावला गेला, काय बोलायचे, काय नाही, तसेच काय करायचे, काय नाही याबाबत कमालीच्या यशस्वी योजना युतीजवळ होत्या. आघाडी मात्र मित्रपक्षांच्या, स्वपक्षाच्या गटबाजीमध्ये अडकून पडली. युतीने पेरलेल्या जाळ्यात फसली.

आज मारकडवाडीसारखे प्रकरण, विरोधकातील महत्त्वाच्या सशक्त नेत्यांचा मोठ्या प्रमाणावर पराभव, राज्यातील राजकीय, सामाजिक, जातीय स्थिती, कुठल्याही भावनात्मक, अस्मितादर्शक लाटेचा अभाव, आकडेवारीतील संख्यात्मक फेरबदल वा दोष, यावरून ईव्हीएम निकालावर विरोधकांकडून, बुद्धिवाद्यांकडून संशय घेतला जात आहे. त्याचा कुठेतरी सक्षम यंत्रणेद्वारा योग्य तो खुलासा झाला नाही, तर या निवडणुकीवरून राजस्थान, मध्य प्रदेश, छत्तीसगढ, हरियाणा येथील विधानसभेच्या निकालांवरही संशय व्यक्त केला जाईल (तसा तो होऊ लागलाही आहे.), असो.

सांप्रत सरकारला आता पुरेपूर पाच वर्षांचा कालावधी मिळाल्याने सारे काही विसरून राज्याच्या विकासावर भर द्यावा लागेल. त्याचबरोबर आर्थिक शिस्तही पाळावी लागेल. मध्यंतरी मुख्यमंत्रिपदासाठी संदिग्ध वातावरण निर्माण करण्यात आलेले असतानाच अनुभवी अशा फडणवीसांच्या हाती राज्याची सूत्रे देणे हे राज्याकरिता महत्त्वपूर्ण वाटते. केवल सवंग लोकप्रियतेसाठी फडणवीस कुठलाही निर्णय घेणाऱ्यांपैकी नाहीत हे त्यांचे विरोधकही मान्य करतात. एकीकडे लोककल्याणकारी कार्य, तर दुसरीकडे विकास योजना (तेही राज्याची आर्थिक स्थितीशी तडजोड न करता) यामध्ये योग्य समन्वय ते साधू शकतात. अजित पवार, एकनाथ शिंदे आदी दिग्गज अनुभवी मंडळींची त्यांच्या मंत्रिमंडळात वर्णी असल्याने त्यांना निर्णय घेणे सुकर जातील. फक्त न्याय्य तत्त्व, दायित्व, लोककल्याण, आदी मुद्दे नवे सरकार जोपासतील याचा विश्वास वाटतो. दुसरीकडे प्रतिपक्ष काँग्रेस, राष्ट्रवादी (शरद पवार), शिवसेना (उद्धव ठाकरे) यांना कमी जागा मिळाल्या असल्या, तरी त्यांची हिंमत खचल्याचे जाणवत नाही. आत्मपरीक्षण करून नव्या जोमाने आता आघाडीने कार्य करायला हवे. यातूनच जो इतिहास निर्माण होतो तो युगप्रवर्तक असतो. विरोधक संख्येने कमी असले, तरी ते सरकारला दिशादर्शक आणि सरकारद्वारे झालेल्या चुका लक्षात आणून देत असतात. प्रसंगी आक्रमकपणे भूमिकाही घेत असतात. त्यामुळे विरोधकांचे कमजोर होणे म्हणजे लोकशाहीचे दुर्बलीकरण असते. त्यामुळे विरोधकांनी नव्या जाणिवेने विधायक कार्य करणे आवश्यक ठरते.

आज विरोधकांचे आणि सरकारचे नाते हे व्यक्तिगत विद्वेषाच्या पातळीवर नसले पाहिजे, असे वाटते. तसेच सरकारमध्ये असलेल्या, बाहेर असलेल्या, विरोधात असलेल्या व्यक्तींनी जातीय सलोखा कायम ठेवून कुणाच्या धार्मिक भावना दुखावणार नाहीत, याची काळजी घेतली पाहिजे किंबहुना फडणवीससारख्या सुसंस्कृत, उच्चविद्याविभूषित व्यक्तीच्या सरकारमध्ये असे होणार नाही, अशी आशा वाटते. आज काँग्रेस संघटनेत सक्रिय कार्यकर्ते आमूलाग्र बदल घडवू शकतात. त्यामुळे काँग्रेसला लोकांमध्ये वावरून, रस्त्यावर उतरून, लोकांच्या प्रश्नांसाठी कार्य करणाऱ्या सक्रिय कार्यकर्त्यांची नितांत आवश्यकता आहे. प्रसंगी त्यांनी बीजेपीचे संघटन कौशल्य आत्मसात करण्यात वावगे नाही. शरद पवारांचा पक्ष नव्या बांधणीतून जात असल्याने त्यांना जम बसविण्यास वेळ लागेल; परंतु पवारांच्या पश्चात धुरा सांभाळणारा जननेता कोण? या प्रश्नाचे उत्तर हे निश्चितच नव्या दमाचे सशक्त नेते असतील; परंतु त्यांची पोकळी भरून काढणारा नेता देश स्तरावर अजून तरी कोणी वाटत नाही. शरद पवारांची राजकीय प्रगल्भता, सामाजिक जाणीव, कणखर तसेच व्यावहारिक वृत्ती अन्य कुणामध्ये असेल असे वाटत नाही. दुसरीकडे उद्धव ठाकरे यांचाही पक्ष त्याच नव्या बांधणीतून जात आहे. सुरुवातीला अतिआक्रमक दिसत असले, तरी त्यांचा राजकारणातील प्रामाणिकपणा, सच्चेपणा, स्वाभिमानी बाणा तमाम महाराष्ट्राला भावला आहे; आज त्यांच्या पक्षांच्या आमदारांची संख्या जरी वीसच्या घरात असली, तरी उद्याला सर्व काही गमावूनही हार न मानण्याची वृत्ती संपूर्ण देशाला प्रेरणादायी ठरेल, यात शंका नाही. त्याचबरोबर आघाडीने वंचितला आणि युतीने मनसेला सोबत घेतले असते आणि राज्याच्या विधानसभेत त्यांचेही प्रतिनिधित्व असते, तर आणखी त्यांच्या चळवळीचा, अनुभवाचा फायदा राज्याला झाला असता, असो.

शेवटी राज्याचे हित जोपासणे महत्त्वाचे असल्याने नव्या सरकारने विरोधकांना सोबत घेऊन राज्याच्या प्रगतीची (सामाजिक, आर्थिक संतुलन राखून) स्थिर वाटचाल केली पाहिजे. त्याचबरोबर राजकीय सुसंस्कृतपणा कसा जपला जाईल आणि सामान्य जनतेला सरकारबद्दल आत्मीयता कशी वाटेल, त्याचबरोबर टीकाकारांची टीका सकारात्मक घेऊन त्याबाबत पावले उचलली गेली पाहिजेत. समाजातील प्रत्येक घटकांचा, घटकातील प्रत्येकाचा विचार झाला पाहिजे. विशेष करून आर्थिक, सामाजिक दुर्बल घटकांकडे सरकारने विशेष लक्ष दिले पाहिजे. तेव्हाच महाराष्ट्र खऱ्या पुरोगामीत्त्वाकडे पुन्हा एकदा वळला आहे, असे म्हणता येईल!

### विषयांतर

# ती ज्वारी, मज प्यारी....!!!

रुपेश पोहरे
9423846306
rupeshpohare21@gmail.com

सध्या ज्वारी सुपर ट्रेंडमध्ये आहे...कुणी ज्वारीची खिचडी बनवतंय... कुणी डोसे बनवतंय... कुणी कसल्याशा मॉडर्न डाएट फूडमध्ये तिचा वापर करतंय..आणखीही बरंच काही..म्हणजे एकुणातच ज्वारी ही अत्यंत गुणी असल्याचा सगळयांना साक्षात्कार झालाय.

पण का कुणास ठाऊक... मला नं माझी भोळी भाबडी ज्वारी या सगळया आधुनिक प्रयोगांमध्ये कमालीची अवघडल्यासारखी वाटतेय. ज्वारीला जर बोलता आलं असतं, तर ती नक्की म्हणाली असती की सध्या तिला 'नमक हलाल' मधली स्मिता पाटील झाल्यासारखं वाटतंय...म्हणजे स्मिताने 'नमक हलाल'मध्ये उत्तम काम केलं, पण ती कलात्मक चित्रपटात जितकी खुलली तितकी काही कमर्शिअल चित्रपटात रमली नाही..

ज्वारीचं तसंच आहे..ती खऱ्या अर्थाने खुलते, ती तीनच रूपात. पहिलं रूप हुरड्याचं.. दुसरं भाकरीचं आणि तिसरं थालीपिठाचं.. ज्याने या तीन रूपांत ज्वारीला अनुभवलं आहे...तो ज्वारीच्या इतर प्रकाराला फारसा भुलणार नाही.

ज्वारी मुळात सात्विक.. आणि कोमल. साधारण डिसेंबर- जानेवारीच्या दरम्यान ती हुरड्यावर येते असं म्हणतात. मग त्या गुलाबी थंडीत शेतात मांडलेल्या गोवऱ्यांच्या चुलीवर कोवळया ज्वारीची कणसं भाजायची..ती हातावर चुरडायची किंवा पोत्यावर घासायची आणि मग तो हुरडा लसणीच्या चटणीबरोबर तोंडात अलगद सोडायचा... ह्याचा आनंद ज्याने चाखला नाही, तो कमनशीबीच म्हणावा लागेल. आताशा डिसेंबर सरला, की हुरडा पार्ट्यांच्या जाहिराती दिसायला लागतात.. थोडं कमर्शिअल असलं तरी हा आनंद नक्कीच विकत घेऊन अनुभवण्यासारखा आहे.

हुरड्यानंतर जवळची ती ज्वारीची भाकरी.. हातावर नजाकतीने थापून बनवलेली आणि चुलीवर भाजलेली ज्वारीची भाकरी म्हणजे केवळ सुख... (अलीकडे पोळीसारखी लाटून भाकरी बनवणारा एक वर्ग आहे.. त्याच्याकडे सपशेल दुर्लक्ष करणं इष्ट.. कारण मुळात लाटून बनते ती भाकरी नव्हेच..) चुलीवर टम्म फुगलेली ज्वारीची भाकरी ताटात पडावी आणि तिच्या सोबतीने गरम झुणका... सुकी पालेभाजी ..मिरचीचा खर्डा.. वांग्याची भाजी किंवा भरीत.. असं काहीतरी असावं. बस बस.. अगदी पहिल्या घासालाच... 'अमृताहूनि गोड' ही संकल्पना फक्त देवाच्या नावालाच नाही, तर ज्वारीच्या भाकरीलाही लागू होते हे मनोमन पटतं. बरं.. तोंडी लावणं नसेल तरी या भाकरीचं काही बिघडत नाही.. नुसता गरम पापुद्रा तेल, तिखट किंवा तूप, तिखट लावून खाल्ला तरी ब्रम्हानंदी टाळी लागते.

आणखी एक महत्त्वाचं म्हणजे..ज्वारी कितीही सात्विक असली तरी तिला सामिष जेवणाचं अजिबात वावडं नाही... मटणाच्या झणझणीत रश्श्यासोबतही तिचं अगदी छान जमतं.. पसरट ताटलीमध्ये अगदी वर्षानुवर्ष एकमेकांचे व्हॅलेंटाईन असल्यासारखे दोघं एकजीव होतात आणि खवय्याला स्वर्गीय आनंद देतात.. ज्वारीची भाकरी ही गरिबाघरची अशी अप्सरा आहे...रात्री टाकलेली भाकरी सकाळी दही अन् हिरव्या मिरचीचा ठेचा खाताना किंवा फोडणीच्या ताकासोबत येणारी मजा शब्दात सांगता येणार नाही.. जिचा श्रीमंतालाही मोह पडावा.

आणि आता.. ज्वारीचं थालीपीठ... अंगाबरोबरच्या तेलात तव्याला लावून केलेलं ज्वारीचं खरपूस थालीपीठ असो, नाहीतर कढईमध्ये तळलेलं खुसखुशीत थालीपीठ असो... ते नाश्त्याचीही रंगत वाढवतं आणि प्रसंगी जेवणाचीही.. घरात थालीपीठ बनतं आहे, हे वेगळं सांगायची गरज पडत नाही.. तव्यावर किंवा कढईत पडताक्षणी त्याचा घमघमाट घरातल्यांच्या, अगदी शेजारच्यांच्याही त्याच्या स्वादावरून पर्सनल इन्व्हिटेशन देऊन येतो. माझा वैयक्तिक अनुभव असा आहे की घरात 'थालीपीठ' बनलं की शेजाऱ्यांची आपल्याकडे हमखास 'कामं' निघतात.. लालसर सोनेरी रंगाचं ज्वारीचं खुसखुशीत थालीपीठ.. त्याच्या मधोमध लोण्याचा गोळा आणि सोबत लिंबूमिर्चीचं लोणचं, असा नजारा दिसला की थेट कामावर फोन करावा आणि झोपेसाठी वेळ मागून घ्यावा.. कारण तुडुंब थालीपीठ खाल्ल्यावर निद्रा अपरिहार्य असते.

तर अशा या ज्वारीला आज अचानक 'ग्लॅमर आलंय... पण ज्वारीचं मोठेपण तिच्या साधेपणात आहे.. नऊवारी साडीचं फ्युजन फॅशन शो मध्ये टाळ्या घेत असलं, तरी तिचा खरा रुबाब आणि देखणेपण तिच्या काठा आणि पदरात आहे... कपाळावरच्या चंद्रकोरीत आहे ..ज्वारीचंही अगदी तसंच आहे ..' ट्रेंड म्हणून ती खिचडी, डोसा आणि डाएटमध्ये रेंगाळत असली, तरी आम्हाला ती हुरडा.. भाकरी आणि थालीपीठातच प्रिय आहे!

### मनाचिये गुंती

# स्वतःवर प्रेम करा राव....



वैशाली पाटील
9420350171

दिवस रात्र आपण इतरांशी आपली तुलना करत असतो...हा सुंदर दिसतो, ती छान बोलते, तिची साडी किती सुंदर, त्याची कार किती मस्त आहे, त्याची बायको मस्त जेवण करते...वगैरे वगैरे...खरं सांगायचं तर आपण मुळात; स्वतःला स्वीकारायलाच तयार नसतो.. जसे आहोत-अगदी तसे.. त्यामुळे कायम इतरांशी तुलना करत राहतो..


मोर छान दिसतो, म्हणून कावळा जगणं सोडून देतो का हो? किंवा कोकीळ गोड गाते, म्हणून साळुंकी ओरडणं सोडून देते का?.. अगदी त्याचप्रमाणे 'आपण जसे आहोत' तसं स्वतःच्या गुण- दोषांसकट स्वतःचा स्वीकार करून स्वतःवर मनापासून प्रेम करणं गरजेचं असतं आणि स्वतःवर जर प्रेम कराल, तरच तुम्ही इतरांवर प्रेम करू शकाल...

इतरांसाठी जगता जगता स्वतःसाठी जगायचं राहून जातं.. स्वतःवर प्रेम करायचं राहून जातं.. आपण स्वतःला इतके गृहीत धरायला लागलोय की, आपल्यातील इच्छा, आकांक्षा, महत्त्वाकांक्षा, क्षमता या गोष्टींचा जणू विसरच पडायला लागला आहे.. आपण इतरांचा इतका विचार करायला लागलोय की, स्वतःचे अस्तित्वच विसरून जातोय..

आपण दुसऱ्यांच्या प्रत्येक चांगल्या गोष्टीवर त्यांना शाबासकी देतो, पण स्वतः केलेल्या चांगल्या गोष्टीवर स्वतःचीच पाठ थोपटायची विसरून जातो.. इतरांसाठी आपल्याकडे वेळच वेळ असतो, पण थोडा वेळ स्वतःसाठी आपण काढू शकत नाही..म्हणून कधी तरी स्वतःवरही भरभरून प्रेम करा, स्वतःचा निरपेक्ष स्वीकार करा.

स्वतःवर प्रेम करण्यापेक्षा इतरांवर प्रेम करणं सोपं असं वाटतं, पण जर तुम्हाला स्वतःवर प्रेम करता येत नसेल, तर इतरांशी निरोगी नातेसंबंध निर्माण करणंदेखील कठीण आहे. ते जे काही असेल ती फक्त तुलना असेल...स्वतःला नावं ठेवण्यापेक्षा किंवा स्वतःचा अपमान करण्यापेक्षा आपल्या आवडीच्या गोष्टींवर लक्ष केंद्रित करा. तुम्ही तुमच्या जीवलग मित्राशी जसे बोलता तसं स्वतःशी बोला.

तुम्ही केलेल्या कर्तृत्वाचा उत्सव साजरा करा आणि तुमच्या प्रयत्नांसाठी स्वतःलाच बक्षीस द्या. तुम्ही जे काम केलं आहे, त्यात त्रुटी शोधण्याऐवजी, तुम्ही एखादे कार्य पूर्ण करण्यासाठी केलेल्या कामाचं/प्रयत्नांचं कौतुक करा. निरोगी सीमा सेट करा आणि



जेव्हा तुमच्यात ऊर्जा आणि स्वारस्य असेल तेव्हाच इतरांना मदत करा. आधी स्वतःची काळजी घ्या आणि मग तुम्हाला इतरांसाठी पसरवायला अधिक प्रेम मिळेल. स्वतःवर वेळ घालवण्याबद्दल दोषी वाटणे सोपे आहे; परंतु वास्तविकता अशी आहे, की हा वेळ तुम्हाला रिचार्ज करण्याची परवानगी देतो जेणेकरून तुम्ही इतरांना अधिक मदत करण्यास सक्षम असाल. प्रत्येकाची स्वतःची एक वेगळी (युनिक) ओळख असते. तुमच्यातील ते वेगळेपण ओळखा आणि ते जपा...!!

### वाचक विचार मंच

## तरुणाई लग्नाच्या बाबतीत उदासीन आहे का?

आजची तरुणाई लग्नाच्या बाबतीत उदासीन असल्याचे दिसून येत आहे, तर काहींना लग्न करायची इच्छा असूनही वाढलेल्या अपेक्षांमुळे किंवा तडजोड करायची तयारी नसल्यामुळे योग्य तसा जोडीदार मिळेनासा झाला आहे. जोडीदार निवडताना वर पक्षाला नाकीनऊ येऊ लागले आहे. आजकाल कामाच्या वेळा, तणाव, स्पर्धा या सगळयामुळे तरुण पिढीपुढे आव्हाने जास्त आहेत हे जरी खरे असले, तरी कुठेतरी सुवर्णमध्य काढायची तयारी दोघांनी दाखवायला हवी. प्रत्येकाला अगदी मनासारखा जोडीदार/साथीदार मिळेलच असे नाही. मानापनाचा विचार केला, तर बरेचदा वर पित्याकडून वरदक्षिणा, मानपान, कपडे, भांडी, अगदी सुईपासून सर्व संसाराची मागणी केली जात असते; परंतु प्राप्तस्थितीत फक्त मुलगी द्या हो, अशी विनवणी वर पित्याकडून वधू पित्याकडे होताना दिसत आहे, तर वधू पित्याकडून शेती, गाडी, बंगला, नोकरदार मुलांची मागणी केली जात आहे; परंतु ही मानसिकता बदलायला हवी. शेतकरी, व्यवसायधारक अशी मुले खूप आहेत. आपल्या मुलीला नोकरदारच हवा ही मानसिकता बदलायला हवी. सध्या विवाह सोहळयांमध्ये एजंटगिरी फोफावली असून फसवेगिरी वाढली आहे. त्यामुळे वरांना मोठ्या प्रमाणात आर्थिक नुकसानीला सामोरे जावे लागत आहे. मुलांचे लग्न जमवण्यासाठी किंवा सून म्हणून मुलगी आणण्यासाठी अनाथालयातील मुलीचा स्वीकार करावा, असेही अनेकांचे मत आहे, जर आयुष्याच्या प्रत्येक वळणावर जशी थोडीफार तडजोड आपण करत असतो तशीच तडजोड जोडीदाराबरोबर केली, तर बिघडले कुठे? कारण या जगात कोणीच परफेक्ट नाही हेदेखील लक्षात घेणे तितकेच गरजेचे आहे.

**राजू जाधव,**
मांगूर, जि. बेळगांव

### धुमस

**जय हो!**
खनमन खुटा
जावईबापू उठा
'शपथ' न घेण्याचा
निर्णय घेतला मोठा

'मातोश्रीं'ची 'मशाल' भडकली
'पंजा' आवळू म्हणते 'आय'
'साहेबां'नी फुंकली 'तुतारी'
सांगा पुढे होणार काय?

'कमळ' म्हणालं 'धनुष्या'ला
सर्वकाही आहे ओके
'घड्याळा'ने गजर केला
माझेही पडतात नियमित ठोके

कितीही घेऊ द्या
बहुमतांवर शंका
पाच वर्षे बिनधोकपणे
आपलाच वाजणार डंका

मावशी म्हणाली पेंद्या
रंगलाय कसा हा वग बाई?
बॅलेट म्हणाले ईव्हीएमला
कुठे नेऊन ठेवली लोकशाही?

**ॲड. अनंत खेळकर**, अकोला

### संवाद

# लोकसंख्यावाढीच्या दराचे वास्तव!

नुकतीच एका कार्यक्रमात सत्तारूढ पक्षाच्या मातृसंघटनेच्या प्रमुखांनीच लोकसंख्येमध्ये होत असलेल्या घसरणीबाबत चिंता व्यक्त केली होती. तेव्हा या भविष्याकडे पाहताना लोकसंख्यावाढीच्या दराचे हे वास्तव...

भारतीय जनगणनेनुसार वेगवेगळ्या धर्मीयांची लोकसंख्या नेमकी कशी बदलते आहे याच्या आकडेवारीसोबत राष्ट्रीय कौटुंबिक आरोग्य सर्वेक्षण माहितीच्या आधारे केलेले विश्लेषण. हे विश्लेषण अमेरिकन संस्था 'प्यू रिसर्च सेंटर' या संस्थेने केलेले आहे.

१९९२ मध्ये असणारा जन्मदर आणि २०१५ साली असणारा जन्मदर. हा जन्मदर लोकसंख्यावाढ कशी होतेय ते दर्शवतो.

मुस्लीम जन्मदर ४.४ वरून २.६ वर आलेला आहे,

घट १.८

हिंदूचा जन्मदर ३.३ वरून २.१ वर आलेला आहे,

घट १.२

ख्रिश्चन जन्मदर २.९ वरून २ वर आलेला आहे,

घट ०.९

बौद्ध धर्मीय जन्मदर २.९ वरून १.७ झालेला आहे,

घट १.२

शिखांचा जन्मदर २.४ वरून १.६ झालेला आहे,

घट ०.८

जैनांचा जन्मदर २.४ वरून १.२ झालेला आहे,

घट १.२

या जन्मदर घटण्याचा सोपा अर्थ असा आहे, की १९९२ च्या तुलनेत २०१५ मध्ये लोकसंख्या वाढीचा वेग सगळयात कमी मुस्लिमांचा आहे आणि सगळयात जास्त शिखांचा आहे.

सगळा देश इस्लामिक होऊ घातलेला आहे, हिंदू धर्म खतरेमे आहे, या हाकाट्या किती भंपक आहेत आणि या पिपाण्या कशा पिचक्या आहेत हेच या आकडेवारीवरून सिद्ध होत आहे.

मुस्लिमांचा जन्मदर घटणे ही स्वागतार्ह बाब आहे. धर्माने चार लग्नांची परवानगी असूनही कुटुंब पोसायला, रोजगार मिळवायला येणारे कष्ट आणि श्रम पाहता कुटुंबातील सदस्यांची संख्या आटोक्यात असणे आवश्यक आहे हे ज्ञान आणि उपरती त्या समुदायाला झाली म्हणून त्यांचा जन्मदर घटलेला आहे.

नेहमीप्रमाणे भौगोलिक विचार करता गायपट्ट्यात राष्ट्रीय सरासरीपेक्षा जन्मदर जास्त आहे आणि दक्षिण भारतात तो राष्ट्रीय सरासरीपेक्षा कमी आहे.

विशेष महत्त्वाची सूचनाः २०१५ नंतरची आकडेवारी का नाही किंवा सदर संस्थेला संशोधन करण्यासाठी का मिळालेली नाही याची साधी सोपी दोन कारणे आहेत.


पहिले म्हणजे यांना माहिती देण्यापेक्षा दडवून ठेवण्यात जास्त रस आहे.

दुसरे म्हणजे जर खरोखर जातनिहाय जनगणना झाली, तर यांच्या प्रचारातील भंपकपणा उघड होईल याची भीती नव्हे, तर खात्री यांनाच स्वतःला असल्याने ना हे जनगणना करण्याचे धाडस करत आहेत ना कुठली सांख्यिकी माहिती उघड करत आहेत.

*(सोशल मीडियावरून साभार)*

### गुल्लेर

# अदीक काय पाह्यजे?



नरेंद्र इंगळे
9561226572

'अरे सोडाना तो मोबाईल.. दिवसभर मोबाईल घेऊन बसतात सायचे.. जराही घर सोडत नाहीत.. संध्याकाळी बाहीर फिराव.. ग्राउंडवर खेळाव.. ते काहीच नाही.. शाळेतून आले की घेतला मोबाईल.. वारेवा लेकरं..'

'काहून तपून राह्यले लेकरावर?'

'अवं हे पोट्टे निरानाम घर सोडत नाहीत.. पोरगा माह्या मोबाईल घेते अन पोरगी तुहा मोबाईल घेऊन बसते.'

'सारेच लेकरं तसे झाले.. त्याहिलेच बोलून काय फायदा?'

'अभ्यास करतानी एकही दिसत नाही.'

'मोबाईलवर अभ्यास करतात ते.'

'मोबाईलवर अभ्यास होत असते काय? मंग कायले पुस्तकं काढले असते? मोबाईल पाहूपाहू या पोराले चष्मा लागला. डोये दुखतात तरी पाह्यते ससरीचा..'

'तुम्ही नेत जा संध्याकाळी लेकरं फिरवाले.'

'दोन दिवस नेले होते.. हे लेकरं हातगाडीवर फुगे खातात अन चाट देऊन घरी पयत येतात. आम्ही लहानपनी असं नाही केलं.'

'मंग काय केलं तुम्ही?'

'शाळा सुटल्यावर ग्राऊंडवर खेळत जाव.. चोर-पोलीस.. आबाधुबी.. कबड्डी..'

'मंग लगन झाल्यावर काय झालं तुमाले? लग्नापासून तुम्ही घरघुसे झाले..'

'मी डिवटीवर जात नाही काय? तिकडून आल्यावर थकते मानूस..'

'बाहीर फिरुन काय करतीन ते? रिकामे लेकरं फिरत असतात.. साऱ्याईले कुठी फिराले न्याव.. निर्मला अन तिचा नवरा ताजमहाल पाहून आला. आमाले कधी दाखोसान ताजमहाल?'

'जाऊ पुढे.. सध्या लेकरं लहान आहेत. इतक्या दूर एखांदं लेकरू हारपलं तर काय करावं? लेकरं कुचीन आहेत. बातच चाट देतात.'

'मंग अजिंठा लेणी पाहाले चला.'

'लेनी मोबाईलात दिसते. टिव्हीले मोबाईल जोडला की मोठं दिसते.'

'इतका चिकटला मानूस एकही पाह्यला नाही.. लोकं हिवात फिरतात.. तुम्ही कुठीच नेलं नाही.'

'जत्रीत फिरलो नाही काय आपून? दरसाल तुले बयरमच्या जत्रीत नेतो.. भंडाऱ्यात जेवाले नेतो.. एकट्याले आमंत्रण असलं तरी साऱ्याईले घेऊन जातो.. अदीक काय पाह्यजे?'

# संरक्षणमंत्री राजनाथसिंह रशिया दौऱ्यावर

## भारताला वेळेवर शस्त्रांचा पुरवठा होणार

**नवी दिल्ली :** केंद्रीय संरक्षणमंत्री राजनाथसिंह आज रविवार, ८ डिसेंबरला रशियाच्या दौऱ्यावर रवाना झाले आहेत. या भेटीत ते रशिया सोबतच्या संरक्षण विषयक करारांना मूर्त स्वरूप देणार आहेत. रशियाकडून भारताला वेळेवर शस्त्रास्त्रांचा पुरवठा करण्यावर या भेटीतील सर्वात मोठा भर असेल.




भारत रशियाकडून २ उरलेल्या एस-४०० क्षेपणास्त्र प्रणालीची मागणी करत आहे.

या दौऱ्यात राजनाथसिंह १० डिसेंबर रोजी रशियाचे पंतप्रधान आंद्रे बेलोसोव्ह यांची भेट घेणार आहेत. तसेच रशियाचे अध्यक्ष पुतीन यांच्या यावर्षीच्या भारत दौऱ्यावरही चर्चा होणार आहे. पुतीन तब्बल ३ वर्षांनी भारत दौऱ्यावर येणार आहेत. रशिया हा भारताचा सर्वात मोठा शस्त्रास्त्र निर्यातक देश आहे.

# विमानातच विवाहित जोडप्याचा सेक्स!

**बँकॉक :** बँकॉकहून झुरिचला जाणाऱ्या स्विस एअरलाइन्सच्या फ्लाइटमध्ये (LX181) जोडप्याचा सेक्स करतानाचा व्हिडिओ व्हायरल झाला होता. हा व्हिडिओ फ्लाइट क्रूने रेकॉर्ड केला आणि सोशल मीडियावर पोस्ट केला, त्यानंतर एअरलाइन आणि क्रू मेंबर्सवर जोरदार टीका होत आहे. वृत्तानुसार, ही घटना कॉकपिटजवळील फॉरवर्ड गॅलीमध्ये, प्रथम श्रेणीच्या

### व्हिडिओ सोशल मीडियावर पोस्ट



सीटपासून वर आली आहे. कॉकपिटच्या दारावर थेट कॅमेरा बसवण्यात आला आहे, ज्याचा उद्देश सुरक्षितता सुनिश्चित करणे हा आहे.

# रोजगार हमी योजनेच्या मजुरांचे पैसे थकले!

## ४ कोटी ४९लाख रक्कम थकबाकी

**पालघर:** पालघर जिल्ह्यात मनरेगा योजनेअंतर्गत वनविभाग, ग्रामपंचायतीसह विविध विभागात रोजगार हमी योजनेवर काम केलेल्या आदिवासी मजुरांच्या मजुरीच्या श्रमाचे ४ कोटी ४९लाख ४८ हजार २२८ रुपये इतकी रक्कम थकली आहे. महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना ही केंद्र सरकारची महत्त्वाकांक्षी योजना असून या योजनेअंतर्गत काम करणाऱ्या लाभार्थ्यांना अकुशल रोजगार पुरवला जातो. यामध्ये शंभर दिवसापर्यंत रोजगाराची हमी राज्य सरकार देते. बेरोजगारांना रोजगार निर्माण करून देण्याबरोबरच शाश्वतता निर्माण करणे हे या योजनेचे मूळ उद्दिष्ट आहे.



**पुणे :** बंगालच्या उपसागरात तयार झालेला कमी दाबाचा पट्टा कमकुवत झाला असून राज्यात कोरडे व शुष्क वारे वाहणार आहेत. येत्या ४ दिवसात महाराष्ट्रात तापमानात घट होणार असून ३ ते ४ अंशांनी तापमान कमी होण्याची शक्यता आहे. त्यामुळे आज रविवारपासून तापमानात घट होऊन थंडी वाढली आहे.

# वॉर्डमध्ये नेताना लिफ्ट कोसळून महिलेचा मृत्यू

**मेरठ :** उत्तर प्रदेशातील मेरठ येथील रुग्णालयात लिफ्ट तुटल्याने एका महिलेचा मृत्यू झाला आहे. प्रसूतीनंतर या महिलेला तिच्या वॉर्डात हलवले जात होते. यादरम्यान लिफ्ट तुटली आणि लिफ्टमध्ये बसलेल्या महिलेचा मृत्यू झाला. या घटनेनंतर महिलेच्या कुटुंबीयांनी हॉस्पिटलमध्ये गोंधळ घातला आणि तोडफोडही केली. घटनेची माहिती मिळताच पोलीसही



घटनास्थळी पोहोचले आणि कसेबसे लोकांना शांत केले. रुग्णालयावर निष्काळजीपणाचा आरोप कुटुंबीयांनी केला आहे. मेरठमधील शास्त्रीनगर येथील कॅपिटल हॉस्पिटलमध्ये ही घटना घडली.

# गोव्याच्या सीमावर्ती भागात पट्टेरी वाघांचा अधिवास

**सावंतवाडी :** आंबोली (ता.सावंतवाडी) ते मांगेली (ता.दोडामार्ग) या सह्याद्रीच्या पट्ट्यात दुर्मिळ होत चाललेल्या आठ वाघांचे अस्तित्व वन विभागाच्या सर्वेक्षणामध्ये आढळून आले आहे. त्यामुळे या सह्याद्रीच्या पट्ट्यात मुंबई उच्च न्यायालयात व्याघ्र कॉरिडॉर होण्यासाठी दाखल करण्यात आलेल्या याचिकेला बळकटी मिळाली आहे. वनशक्ती संस्थेची

### सह्याद्रीत पहिल्यांदाच विक्रमी नोंद



याबाबत न्यायालयात याचिका सुरू आहे. जानेवारी ते मे २०२४ या कालावधीत वनविभागाने लावलेल्या कॅमेऱ्यात हे वाघ कैद झाले आहेत.



# एआय ट्रान्सलेटर ॲपच्या मदतीने संबंधित रुग्णांची घेणार काळजी

# महाकुंभात एआयचा वापर

वृत्तसंस्था

**नवी दिल्ली:** महाकुंभात देश-विदेशातील भाविक संगमनगरीत जमणार आहेत. या काळात बाहेरच्या राज्यातून किंवा परदेशातील भाविक आजारी पडल्यास भाषेच्या समस्येमुळे त्यांचे उपचार थाबवले जाणार नाहीत. एआय ट्रान्सलेटर ॲपच्या मदतीने संबंधित रुग्ण डॉक्टरांना त्याच्याच भाषेत आजाराबद्दल सांगू शकणार आहे. हे ॲप प्रत्येकाची बोलण्याची भाषा हिंदी किंवा इंग्रजीमध्ये बदलू शकेल. देशात प्रथमच कॅन्टोन्मेंट जनरल हॉस्पिटलच्या आयसीयू वॉर्डमध्ये याचा वापर केला जाणार आहे. एआय ट्रान्सलेटर ॲपमध्ये २२ भारतीय आणि १९ परदेशी भाषा आहेत.

या ॲपमध्ये तमिळ, तेलगू, मल्याळम, बंगाली आणि इतर राज्यांच्या भाषा आहेत. त्याच वेळी, इंग्रजी, अरबी, फ्रेंचसह १९ आंतरराष्ट्रीय भाषा आहेत. देश-विदेशातून येणाऱ्या रुग्णांना उपचार मिळावेत, यासाठी कॅन्टोन्मेंट बोर्डाच्या कॅन्टोन्मेंट हॉस्पिटलमध्ये उपस्थित डॉक्टरांच्या फोनमध्ये ॲप बसवण्यात येणार आहे.


## कॅन्टोन्मेंट जनरल हॉस्पिटलमध्ये सुविधा

कॅन्टोन्मेंट जनरल हॉस्पिटल त्याच्या २० आयसीयू बेडमध्ये एआय ट्रान्सलेटरची सुविधा प्रदान करेल. यामध्ये रुग्णांच्या बेडशेजारी माईक बसवण्यात येणार आहे. तो डॉक्टरांशी त्याच्याच भाषेत संवाद साधू शकेल आणि डॉक्टर जे काही बोलतील ते रुग्णाला त्याच्याच भाषेत समजेल. आत्तापर्यंत देशातील कोणत्याही रुग्णालयात ही पद्धत वापरली गेली नसल्याचा दावा कॅन्टोन्मेंट बोर्डाकडून करण्यात आला आहे. तसेच कॅन्टोन्मेंट जनरल हॉस्पिटलमध्ये एआय कॅमेरे बसवण्यात येणार आहेत. लखनौचे वरिष्ठ डॉक्टर या कॅमेऱ्यांद्वारे रुग्णांवर नजर ठेवतील. एआय कॅमेऱ्यांच्या मदतीने रुग्णांच्या ढासळत्या प्रकृतीची माहिती आपोआप डॉक्टरांपर्यंत पोहोचेल.

# अमेरिकेने सीरियाच्या युद्धात अडकू नये– डोनाल्ड ट्रम्प

**वाशिंग्टन:** सीरियामध्ये वेगाने प्रगती करणाऱ्या बंडखोर सैन्याने राजधानी दमास्कसला वेढा घालण्यास सुरुवात केल्याचे म्हटले आहे. या प्रकरणावर, अमेरिकेचे नवनिर्वाचित राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी, सीरियातील परिस्थितीमध्ये अमेरिकेने मोडता कामा नये असे म्हटले.

राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी सोशल मीडियावर एक पोस्ट करत 'एका अभूतपूर्व हालचालीत, सीरियातील विरोधी सैनिकांनी अत्यंत समन्वित हल्ल्यात अनेक शहरे पूर्णपणे काबीज केली आहेत आणि ते आता दमास्कसच्या सीमेवर आहेत, असदला पराभूत करत आहेत, त्यासोबतच आम्ही एक मोठा निर्णय घेण्याची तयारी करत आहोत असेही म्हटले आहे. पुढे ते म्हणाले, रशिया युक्रेनमध्ये खोलवर गुंतलेला आहे आणि सीरियातून हा शाब्दिक कूच थांबवू शकत नाही



असे दिसते, तिथे ६००,००० हून अधिक सैन्याचे नुकसान झाले आहे, ज्या देशाने वर्षानुवर्षे संरक्षित केले आहे. येथेच माजी राष्ट्राध्यक्ष ओबामा यांनी वाळूतील लाल रेषेचे रक्षण करण्याच्या त्यांच्या वचनबद्धतेचा आदर करण्यास नकार दिला आणि रशियाच्या हस्तक्षेपाने सर्वकाही चुकीचे झाले; परंतु आता त्याला शक्यतो असदप्रमाणे बाहेर काढले जात आहे आणि हीच त्याच्यासाठी सर्वात चांगली गोष्ट असू शकते.

## भाजपने शेतकऱ्यांना खोटी आश्वासने दिली

**नवी दिल्ली :** भाजपने शेतकऱ्यांना खोटी आश्वासने दिली. ती पूर्ण केली जात नाही म्हणून आमचा अन्नदाता रस्त्यावर आहे. त्यांच्याशी चर्चा करावी असे म्हणत आम आदमी पक्षाने केंद्र सरकारवर टीका केली. शेतकरी आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर आम आदमी पक्षाच्या प्रवक्त्या प्रियंका कक्कड म्हणाल्या की, देशाचा अन्नदाता आपल्या मागण्यांसाठी रस्त्यावर उतरला, हे दुःखदायक आहे. शेतकऱ्यांना आंदोलन करण्यापासून रोखले जात आहे. भाजप सरकारने शेतकऱ्यांशी चर्चा करावी, असेही त्या म्हणाल्या. प्रियंका कक्कड म्हणाल्या की, दिल्लीतील जनतेने दोन सरकारे निवडून दिली आहेत. आम आदमी पक्षाचे सरकार लोकांना वीज, आरोग्य, शिक्षण देण्यासाठी काम करत आहे.


# मणिपूरमध्ये हिंसाचार भडकावण्याचा प्रयत्न फसला

वृत्तसंस्था

**इंफाळ :** मणिपूरला पुन्हा एकदा पेटवण्याचा प्रयत्न पोलिसांनी हाणून पाडला आहे. वास्तविक, मणिपूर पोलिसांनी इंफाळच्या थंगल बाजार भागात अपहरणाचा प्रयत्न फसला आणि या घटनेत दोघांचे जीव वाचवले. या प्रकरणी पोलिसांनी या अपहरण प्रकरणी कांगलीपाक कम्युनिस्ट पार्टी (तैबंगंगांबा) या बंदी घातलेल्या संघटनेशी संबंधित दहशतवादी तेनसुबम बँगकिम याला इंफाळ पश्चिम जिल्ह्यातून अटक केली आहे. अटक केलेल्या दहशतवाद्याकडून शस्त्र जप्त करण्यात आले आहे.

अलीकडेच मणिपूरमधील निर्वासित शिबिरातून तीन महिला

### खतरनाक अतिरेक्याला अटक



आणि मुलांचे अपहरण करून त्यांची हत्या करण्यात आली होती. त्यानंतर मणिपूरमध्ये मोठ्या प्रमाणावर हिंसाचार उसळला होता. आता पुन्हा एकदा राज्यात हिंसाचार भडकवण्याचा दहशतवाद्यांचा हेतू होता. मात्र, पोलिसांच्या तत्परतेमुळे अपहरणाचा प्रयत्न हाणून पाडण्यात आला. अटक करण्यात आलेल्या दहशतवाद्याकडून एक ९ एमएम पिस्तूल, सात काडतुसे आणि एक चारचाकी वाहनही जप्त करण्यात आले आहे.

# दक्षिण कोरियात सत्तारुढ पक्षाचा मतदानावर बहिष्कार

## यूक सुक येओल यांचा महाभियोग प्रस्ताव फेटाळला

वृत्तसंस्था

**सेऊल :** दक्षिण कोरियात अध्यक्ष यून सुक येओल यांच्यावर महाभियोग चालवण्यात यावा या संसदेत मांडलेल्या ठरावावरील मतदानावर सत्तारुढ पीपल्स पॉवर पार्टीने बहिष्कार घातल्यामुळे हा ठराव मंजूर होऊ शकला नाही. मतदान सुरू असलेल्या कक्षात खासदारांनी प्रवेशच करू नये, यासाठी पीपीपीच्या खासदारांनी वाट अडवून ठेवली होती. त्यामुळे विरोधक आणि सत्तारुढ पक्षाच्या खासदारांमध्ये संसदेतच बाचाबाची झाली.

हा ठराव मंजूर होण्यासाठी दोन तृतीयांश बहुमताने मंजूर होणे गरजेचे होते. संसदेतील



३०० सदस्यांपैकी २०० सदस्यांनी ठरावाच्या बाजूने मतदान केले, तरच महाभियोगाचा ठराव मंजूर होऊ शकला असता. मात्र, त्यासाठी विरोधकांना ८ मते कमी पडत होती. मात्र, मार्शल लॉ उठवण्याच्या ठरावाच्यावेळी सत्तारुढ पीपल्स पॉवर पार्टीच्या १८ सदस्यांनी विरोधकांच्या बाजूने मतदान केले होते. तेच सदस्य महाभियोगाच्या ठरावाच्याही बाजूने मतदान करतील, अशी विरोधकांची आशा होती. प्रत्यक्षात सत्तारुढ पक्षानेच या ठरावावरील मतदानावर बहिष्कार घातल्यामुळे ठराव आपोआपच फेटाळला गेला. संसदेचे सभापती वू वोन शिक यांनी हा ठराव फेटाळला जाण्याबद्दल तीव्र खेद व्यक्त केला आहे. ही घटना देशाच्या लोकशाहीसाठी अत्यंत लाजिरवाणी असल्याचे त्यांनी म्हटले आहे.

# उधमपूरमध्ये दोन पोलिसांचा संशयास्पद मृत्यू; पोलीस व्हॅनमध्ये सापडले मृतदेह

वृत्तसंस्था

**उधमपूर :** जम्मू-काश्मीरमधील उधमपूर जिल्ह्यात रहमबल भागात दोन पोलिसांचे मृतदेह संशयास्पदरित्या सापडले आहेत. दोघांनाही लागलेल्या गोळया या एके-४७ रायफलमधून झाडलेल्या आहेत. यामध्ये एक पोलीस कर्मचारी जखमी झाला आहे. पोलिसांचे पथक घटनास्थळी पोहोचले आहे. पोलिसांनी मृतदेह ताब्यात घेऊन तपास सुरू केला आहे.



रविवारी सकाळी ६.३० च्या सुमारास उधमपूर जिल्हा मुख्यालयातील काली माता मंदिराबाहेर पोलीस व्हॅनमध्ये पोलिसांचे गोळया झाडलेले मृतदेह पडलेले आढळले.

# मुद्रांकांमध्ये पाच पटीने वाढ झाल्याने विक्रीवर परिणाम

**वाडा :** राज्य शासनाने १०० आणि २०० रुपये किमतीचे मुद्रांक पूर्णपणे बंद केले. त्यामुळे नागरिकांना किरकोळ कामासाठी आता पाचशे रुपये किमतीचे मुद्रांक वापरावे लागत आहेत. त्यामुळे सर्वसामान्य जनतेतून तीव्र नाराजी व्यक्त केली जात आहे. साधारणतः दोन महिन्यापासून मुद्रांक विक्रीवर मोठा परिणाम झाल्याचे पाहावयास मिळत आहे. शासनाने शंभर व दोनशे रुपयांचे बंद केलेले मुद्रांक पुन्हा चालू करावे, अशी मागणी सर्वसामान्यांतून होऊ लागली आहे.

## सामान्य व्यवहारांसाठी मुद्रांकाचा वापर

नागरिकांच्या अनेक सर्वसामान्य व्यवहारांसाठी मुद्रांकाचा सर्रास वापर केला जातो. त्यामधून राज्य शासनाच्या तिजोरीत सर्वाधिक महसुलाची भर पडते. नागरिकांना शासनाच्या विविध योजनांचा लाभ घेण्यासाठी तसेच जात प्रमाणपत्र, हक्क सोड



प्रमाणपत्र, भाडेकरार, विविध कर्ज प्रकरणासाठी लागणारी प्रतिज्ञापत्रे, शैक्षणिक कामासाठी लागणारी हमीपत्र व प्रतिज्ञापत्रे, संचकार पत्र, विक्री करार अशा एक ना अनेक कामांसाठी सरसकट १०० रुपयांच्या मुद्रांकाचा वापर केला जात होता; परंतु राज्य शासनाच्या ३० सप्टेंबरच्या नव्या आदेशामुळे सर्व स्तरातील नागरिकांना १३ ऑक्टोबरपासून पाचशे रुपयांचा मुद्रांक वापरावा लागत आहे.

## कॅनडात भारतीय विद्यार्थ्याची हत्या

**ओटावा (कॅनडा) :** भारताच्या २२ वर्षीय विद्यार्थ्याची कॅनडामध्ये भोसकून हत्या करण्यात आली आहे. कॅनडातल्या ओन्टारिओ प्रांतात झालेल्या बाचाबाचीतून ही हत्या करण्यात आल्याचे पोलिसांनी सांगितले. पोलिसांनी या प्रकरणी या विद्यार्थ्याच्या घरातच राहणाऱ्या एकाला द्वितीय श्रेणी हत्येच्या आरोपाखाली अटक केली आहे.

# दर्राघ वादळामुळे ब्रिटनला धोका

## आयर्लंडमधील वीजपुरवठा खंडित

**लंडन:** दर्राघ वादळाच्या प्रभावामुळे ब्रिटन आणि आयर्लंडमध्ये मोठ्या प्रमाणावर वीजपुरवठा खंडित झाला आहे. यामुळे हजारो जणांना घरातच अडकून पडावे लागले आहे. दर्राघ वादळामुळे वाऱ्याचा वेग ताशी ९३ मैल इतका नोंदवला गेला आहे. हवामान विभागाने जवळपास ३ दशलक्ष नागरिकांसाठी सतर्कतेचा इशारा दिला आहे. परिसरातील नागरिकांना सायरनद्वारे आणि मोबाईलवर धोक्याचे संदेश पाठवून हा धोक्याचा इशारा देण्यात आला. ब्रिटनच्या हवामानाचा अंदाज वर्तविणाऱ्या कार्यालयाने सर्वात गंभीर असा रेड अलर्ट जारी केला.



**पणजी :** हवामान खात्याने ८ ते १२ डिसेंबरदरम्यान गोवा राज्यातील वातावरण कोरडे राहण्याची शक्यता आहे. पुढील पाच दिवस राज्यातील कमाल तापमान ३२ ते ३४ अंश तर किमान तापमान २२ ते २४ अंश सेल्सिअस दरम्यान राहण्याची शक्यता खात्याने व्यक्त केली आहे. राज्यात चोवीस तासात सरासरी ४.१ मिलिमीटर पावसाची नोंद झाली.

# रेबीजमुळे आणखी एका कोल्ह्याचा मृत्यू

वृत्तसंस्था

**मुंबई :** मुंबईत सोनेरी कोल्ह्यांचा मृत्यूच्या घटना सुरूच आहेत. दोन दिवसांपूर्वी एका कोल्ह्याचा मृत्यू झाला आहे. चेंबूर जवळ एका सोनेरी कोल्ह्याचा मृतदेह आढळला असून कोल्ह्याचा मृत्यू रेबीजची लागण होऊन झाला आहे. मुंबईमध्ये रेबीजची लागण होऊन वन्यप्राण्याचा मृत्यू झाल्याची ही तिसरी घटना आहे.


रेबीज चाचणीच्या अहवालातून मृत पावलेल्या सोनेरी कोल्ह्याला रेबीज झाल्याचे निष्पन्न झाले. तर तिसऱ्या कोल्ह्याचा मृत्यूही रेबीजमुळे झाल्याचे अहवालातून स्पष्ट झाले आहे. त्यामुळे मुंबईमध्ये रेबीजची लागण होऊन वन्यप्राण्याचा मृत्यू झाल्याची ही तिसरी घटना आहे.

## चौकशीसाठी समिती स्थापन

ठाण्याचे उपवनसंरक्षक अक्षय गजभिये यांच्या अध्यक्षतेखाली वन्यप्राण्यांच्या मृत्यूच्या चौकशीसाठी एक समिती स्थापन करण्यात आली आहे. या समितीमध्ये सहाय्यक वनसंरक्षक दत्तात्रेय मिसाळ, सोनल वळवी, ज्ञानेश्वर रक्षे तसेच रेस्क्यू चॅरिटेबल ट्रस्टच्या नेहा पंचमिया, पशुवैद्यकीय अधिकारी डॉ. विनया जंगले यांचा समावेश आहे. वनविभागाने चेंबूर परिसरात जनजागृती मोहीम राबविण्यास सुरुवात केली आहे. याआधी ऑक्टोबर महिन्यात एका सोनेरी कोल्ह्याचा उपचारादरम्यान मृत्यू झाला होता.

मागील दोन महिन्यांत चेंबूर परिसरात रेबीजमुळे दोन सोनेरी कोल्ह्यांचा मृत्यू झाला आहे. त्यानंतर गुरुवारी याच परिसरात

### कोल्ह्याच्या मृत्यूची तिसरी घटना



आणखी एका सोनेरी कोल्ह्याचा मृतदेह आढळून आला आहे.

## निलंबित आयएएस पूजा सिंघलला जामीन मंजूर

**रांची :** येथील विशेष पीएमएलए न्यायालयाने शनिवारी झारखंड केडरच्या निलंबित आयएएस अधिकारी पूजा सिंघल यांना मनी लॉंड्रिंग प्रकरणात जामीन मंजूर केला. प्रत्येकी २ लाखांचे दोन बॉंड आणि तिचा पासपोर्ट जमा करण्याच्या अटीवर तिला जामीन देण्यात आला. सिंघल यांच्या वकिलाने सांगितले की, न्यायालयाने तिच्या जामीन अर्जावर दोन दिवस सुनावणी केल्यानंतर तिला जामीन मंजूर करण्यात आला.

# आत्मा अन् परमात्मा यांचा योग

**उमेश तोगे** — गेवराईत कुंडलिनी शक्ति जागृती कार्यक्रम

गेवराई/पुण्यभूमी प्रतिनिधी

परमेश्वर हा सुक्ष्म असून प्रत्येक कणाकणात परमेश्वर आहे. परमेश्वर हा अनंतयोगी आहे. परमेश्वराचे अस्तित्व हे अथांग आहे. तर योगा करुन आत्म्याने परमेश्वरा पर्यंत पोहचता येते तर जीव आणि शिव यांच्याशी एकरुप होवून परमेश्वरांशी एकरुप व्हायचं असेल तर सहजयोग करणं गरजेचं आहे. मानवी जीवात खुप शक्ती आहे फक्त तीची प्रचिती येणं महत्वाचं आहे. परमपूज्य माताजी निर्मलादेवी यांचा हा सहजयोग अनुभूतीचा कार्यक्रम आहे. तर आत्मा आणि परमात्मा यांचा योग येणं म्हणजे सहजयोग होय असे प्रतिपादन सहजयोगाचे मुख्य मार्गदर्शक उमेश तोगे यांनी व्यक्त केले.

गेवराई शहरात परमपूज्य श्री माताजी जन्म शताब्दी वर्ष पूर्ती निमित्त श्री आदिशक्ती श्री माताजी श्री निर्मलादेवी यांच्या आशीर्वादाने शहरातील जिल्हा परिषद कन्या शाळेत रविवार दि.८ डिसेंबर रोजी सायं.७ वाजता कुंडलिनी शक्ति जागृती व आत्मसाक्षात्कार कार्यक्रम संपन्न झाला. यावेळी माजी नगरसेवक सौ.



गिताभाभी बाळराजे पवार , सहाय्यक पोलीस निरीक्षक संतोष जंजाळ, पोलीस उपनिरीक्षक शिवाजी भुतेकर , सौ. भाग्यश्री लक्ष्मण पवार, सौ. रत्नमाला मोटे, पत्रकार मधुकर तौर , विनोद नरसाळे, अमोल वैद्य, भागवत जाधव, विनोद पौळ, सुशील टकले, अमोल कापसे यांच्यासह आदी मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन करुन श्री आदिशक्ती श्री माताजी श्री निर्मलादेवी यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. दरम्यान यावेळी गेवराई शहरातून मिरवणूक मार्गाने भव्य मिरवणूक काढण्यात आली. मिरवणुकीत सहजयोगी ताई-दादांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती. तर कार्यक्रमाचे प्रास्ताविक दिंगाबर नजन तर आभार प्रदर्शन अमर कदम यांनी व्यक्त केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी गेवराई सह महाराष्ट्रातील विविध जिल्ह्यातून आलेल्या सहजयोगाच्या साधकांनी विशेष परिश्रम घेतले

### सहजयोगाचे फायदे

१५० पेक्षा जास्त देशात सहजयोगाचे साधक योगा करत आहेत. सहज योगामुळे आपले सगळे आजार बरे होवू शकतात, माणुस बॅलन्स मध्ये येवून शांत होतो तसेच निर्णय क्षमता वाढते, मुलांच्या अभ्यासात प्रगती होवून बुध्दीमत्ता वाढते, मनाला शांती मिळते आणि आत्मसाक्षात्कार मिळतो, योगातून परमेश्वराची प्राप्ती होवू शकते, साधू संत हे मध्यनाडीवर राहतात, माऊली कुंडलीनी शक्ती जागृत होते, स्वादिष्टान्न चक्र क्लेअर पाहिजे त्यामुळे कोणत्याही कामात नेपुण्य लाभते तसेच मानवी शरीरातील शिवशक्ती जागृती होते. टेक्निशियन , मुख्यमंत्री लाडका भाऊ योजनेंतर्गत १ महिला आरोग्य सहाय्यक यांची पदभरती करण्यात आली आहे. प्राथमिक आरोग्य केंद्रात दररोज ५०-६० रूग्ण तपासणीसाठी येतात. प्राथमिक आरोग्य केंद्रात कार्यरत असणाऱ्या एकमेव वैद्यकीय अधिकारी डॉ.शरयु पडोळे यांच्यावर याचा शारीरिक व मानसिक ताण पडत आहे. तसेच काही कामानिमित्त रजा घेतली तर मात्र रूग्णांची अडचण निर्माण होऊन त्यांना उपचारासाठी आर्थिक भुर्दंड सहन करत पाटोदा येथील रूग्णालयात जावे लागते.

# विदर्भात संत बंकटस्वामी महाराजचं मंदिर!

अध्यात्मिक:मूर्ती प्राणप्रतिष्ठा, कलशारोहण सोहळा





बीड/पुण्यभूमी प्रतिनिधी

बीडचे भूमिपुत्र आणि महान संत बंकट स्वामी महाराज यांचे विदर्भात बुलढाणा जिल्ह्यातील विहिगाव येथे भव्य मंदिर साकारले आहे. त्याच मंदिरात दि -१२ डिसेंबर रोजी दुपारी ११.३० वाजता मूर्ती प्राणप्रतिष्ठा सोहळा महंत लक्ष्मण महाराज मेंगडे, रामायणाचार्य संजय महाराज पाचपोर, यांच्या प्रमुख मार्गदर्शनाने देखना सोहळा संपन्न होणार आहे..यात विदर्भ मराठवाड्यासह महाराष्ट्रातील शेकडो संत महंत उपस्थित राहणार आहेत. श्रीक्षेत्र नेकनुर जन्मभूमी येथून शेकडो गाड्या विदर्भात दि ११ रोजी सकाळीं१० वाजता रवाना होणार आहेत. या सोहळ्याचा सर्व स्वामी भक्तांनी लाभ घ्यावा असे आवाहन महंत लक्ष्मण महाराज मेंगडे व भक्त परिवाराच्या वतीने करण्यात आले आहे. वारकरी संप्रदायाचे भक्तिसूर्य सद्गुरु संत बंकट स्वामी महाराज यांनी संपूर्ण महाराष्ट्रात वारकरी संप्रदाय प्रचार प्रसाराचे प्रभावी काम केले.. त्या काळात विदर्भामध्ये चार चार महिने बंकट स्वामी चातुर्मासासाठी वास्तव्यास असायचे. त्याचीच आठवण म्हणून बुलढाणा जिल्ह्यातील विहिगाव या गावात गावकऱ्यांनी पान २ वर...

# आदित्य कृषि महाविद्यालयात शिक्षणदिन

धोरण: दिल्लीचे उपमहासंचालकांचे मार्गदर्शन



बीड/पुण्यभूमी प्रतिनिधी

वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ परभणी अंतर्गत आदित्य शिक्षण संस्था, बीड संचलित आदित्य कृषि महाविद्यालय, बीड येथे कृषि शिक्षण दिनानिमित्त भारतीय कृषि अनुसंधान संस्था दिल्ली चे उपमहासंचालक (कृषि शिक्षण) डॉ. आर. सी. अग्रवाल यांच्या कृषि दिनाचे महत्त्व अधोरेखित करणाऱ्या ऑनलाईन झूम मीटिंग चे थेट प्रक्षेपण करण्यात आले. यावेळी त्यांनी विद्यार्थ्यांना कृषि क्षेत्रातील विविध विषयावर विद्यार्थ्यांना त्यांनी सखोल मार्गदर्शन केले. कार्यक्रमास महाविद्यालयाच्या चारही वर्षाचे विद्यार्थी उपस्थित होते.

३ डिसेंबर हा दिवस कृषि शिक्षण दिन म्हणून आदित्य शिक्षण संस्थेत साजरा करण्यात आला. यावेळी भारताचे पहिले राष्ट्रपती व पहिले केंद्रीय कृषिमंत्री डॉ. राजेंद्र प्रसाद यांच्या जयंतीनिमित्त प्रतिमेचे पूजन करून त्यांचे कृषि क्षेत्रातील पान २ वर...

# सर्पराज्ञीत निसर्गार्पण महोत्सव

उपक्रम:सर्पमित्रांना मोफत स्नेक स्टिकचे वाटप

शिरुर/पुण्यभूमी प्रतिनिधी

प्रति वर्षाप्रमाणे सर्पराज्ञी वन्यजीव पुनर्वसन केंद्र, तागडगाव व वन विभाग बीड यांच्या संयुक्त विद्यमाने १४ डिसेंबर रोजी दत्त जयंती व सर्पराज्ञीचे मार्गदर्शक आदरणीय क्षितिज हिर्लेकर यांच्या जन्मोत्सवानिमित्त प्रति वर्षाप्रमाणे निसर्गार्पण महोत्सव २०२४ चे आयोजन करण्यात आलेले आहे . कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी भगवान बाबा संस्थान तागडगावचे अतुल महाराज शास्त्री तर प्रमुख उपस्थिती ज्येष्ठ समाजसेवक मानवलोकचे कार्यवाहक अनिकेत भैया लोहिया यांची राहणार आहे.

या महोत्सवात सर्पराज्ञी वन्यजीव पुनर्वसन केंद्रात उपचारानंतर पूर्णपणे बरे झालेल्या वन्यजीवांना त्यांच्या मूळ नैसर्गिक अधिवासात सोडून देण्यात येणार आहे .तसेच सर्पराज्ञी सांस्कृतिक नंदनवन मध्ये दुर्मिळ अति दुर्मिळ वृक्षांची लागवड करण्यात येणार आहे. तसेच बीड जिल्ह्यामध्ये आपल्या स्वतःच्या जीवाची परवा न करता सापांना व माणसांना वाचवण्यासाठी अहोरात्र कार्य करणाऱ्या सर्पमित्रांना मोफत स्नेक स्टिकचे वाटप करण्यात येणार आहे. हा निसर्गार्पण महोत्सव सर्पराज्ञी पान २ वर...

# सर्व्हे करुन शेतकऱ्यांना मदत करा

धनंजय मुंडे:भेट घेऊन दिले मागणीचे पत्र



मुंबई/पुण्यभूमी प्रतिनिधी

बीड जिल्ह्यातील खरीप हंगामात अतिवृष्टी व अन्य स्थानिक आपत्तीमुळे पिकांचे नुकसान झाले त्याबाबत तत्कालीन पालकमंत्री असलेल्या धनंजय मुंडे यांनी भारतीय कृषी विमा कंपनीस जिल्हा प्रशासनाच्या माध्यमातून दिलेल्या निर्देशानुसार खरीप २०२४ चा पीकविमा अग्रीम २५% प्रमाणे पात्र शेतकऱ्यांना तातडीने वितरित करण्यात यावा त्याचबरोबर ३० नोव्हेंबर रोजी तामिळनाडू राज्यात आलेल्या 'फेंगल' चक्री वादळामुळे बीड जिल्ह्यात डिसेंबर महिन्याच्या पहिल्या आठवड्यात झालेलता अवकाळी पावसाने रब्बी पिकांचे व फळांचे जे नुकसान झाले, त्यांचे सॅम्पल सर्व्हेक्षण करून शेतकऱ्यांना अर्थसहाय्य करण्याबाबतचे प्रस्ताव प्रशासनाकडून गतीने प्राप्त करून शेतकऱ्यांना मदत दिली जावी, अशी मागणी आज धनंजय मुंडे यांनी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस तसेच उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या कडे पत्राद्वारे केली आहे.

धनंजय मुंडे यांनी आज मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व उपमुख्यमंत्री अजितदादा पवार या दोघांची यासंदर्भात भेट घेऊन मागण्यांचे पत्र उभय नेत्यांना दिले देत चर्चा केली. पान २ वर...

# राहुरी-मांजरी रस्ताचा प्रश्न ऐरणीवर

आक्रमक: ग्रामस्थचा आंदोलनाचा इशार



राहुरी/पुण्यभूमी प्रतिनिधी

राहुरी तालुक्यातील अत्यंत महत्त्वाचा समजला जाणारा प्राथमिक जिल्हा मार्ग राहुरी ते मांजरी रस्ताचा प्रश्न ऐरणीवर आला असुन या पूर्व भाग रस्त्याची अत्यंत दयनीय अवस्था झाली आहे पुर्व भागातील ग्रामस्थ रस्ता दुरुस्तीसाठी लवकरच आंदोलनाचे अस्त्र उपसणार आहे

अत्यंत दैनंदिन रहदारीचा राहुरी ते मांजरी हा रस्ता असून गेल्या अनेक वर्षांपासून हा उघडलेला आहे रस्त्यात खड्डा की खड्ड्यात रस्ते असा प्रश्न प्रवास करणाऱ्या प्रवाशांना पडत असून अनेक ठिकाणी खड्ड्यांमुळे अपघात होऊन प्रवासी जखमी झाले आहेत राहुरी ते मांजरी रस्ता हा पुढे नेवासा मार्गे संभाजीनगरला पान २ वर...

# स्वस्त तांदळाच्या खिचडीचे वाटप

डॉ.गणेश ढवळे:लक्षवेधी आंदोलनाने वेधले लक्ष

बीड/पुण्यभूमी प्रतिनिधी

देशात गोरगरीबांसाठी, दुर्बल घटकांसाठी शासनामार्फत अन्न सुरक्षा कायद्यांतर्गत, अंत्योदय अन्न योजना आदिच्या माध्यमातून राशनकार्ड धारकांना मोफत धान्य वाटप करण्यात येते.परंतु अनेक ठिकाणी स्वस्त धान्य दुकानदारच लाभार्थ्यांच्या रेशनवर डल्ला मारतो.राशन देताना काटा मारणे, धान्य कमी मोजुन देणे तर काही लाभार्थ्यांना धान्य संपल्याची थाप मारून बोळवण केली जाते. स्वस्त धान्य दुकानदारांकडून रेशनच्या धान्याचा मोठ्या प्रमाणावर काळाबाजार होत असुन काळ्या बाजारातुन धान्याची खरेदी विक्री होत असल्याच्या घटना आढळून येतात.बीड जिल्ह्यातील स्वस्त धान्य दुकानदार दारांकडुन रेशनकार्ड धारकांना निकृष्ट दर्जाचे धान्य वाटप करण्यात येत असल्याच्या तक्रारी आहेत. रेशनवर नियंत्रण ठेवणा-या दक्षता समित्या कागदोपत्रीच असुन सामान्य लोकांच्या हक्काचे उल्लंघन आणि स्वस्त धान्य दुकानदारांकडुन रेशनच्या धान्याची काळ्या बाजारात खरेदी विक्री आणि रेशनकार्ड धारकांनी विचारणा




केल्यास अरेरावी आदी प्रकरणी जिल्हा पुरवठा अधिकारी आणि तहसीलदार यांचे अक्षम्य दुर्लक्ष यांच्या निषेधार्थ सामाजिक कार्यकर्ते तथा मुख्य प्रचार प्रमुख बीड जिल्हा माहिती आधिकार कार्यकर्ता महासंघ महाराष्ट्र राज्य डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांच्या नेतृत्वाखाली आज दि.०९ सोमवार रोजी सकाळी बीड तहसिल कार्यालयाच्या आवारात दगडाच्या चुलीवर स्वस्त धान्य दुकानातुन वाटप झालेल्या निकृष्ट पान २ वर...

# बीड-शिर्डी पालखी सोहळा

अध्यात्मिक:साईभक्तांनी नोंदणी करण्याचे आवाहन

बीड/पुण्यभूमी प्रतिनिधी

श्री साई सेवा परिवार बीड यांच्या वतीने श्री दत्तजयंती निम्मित बीड ते शिर्डी पायी पालखी सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. हा पालखी सोहळा दि.१४ डिसेंबर २०२४ रोजी शिर्डीकडे प्रस्थान करणार असून यामध्ये सहभागी होण्यासाठी नाव नोंदणी करावी असे आवाहन करण्यात आले आहे.

बीड येथील साईभक्त गत १७ वर्षांपासून बीड ते शिर्डी पायी पालखी सोहळा काढतात. यंदाचे पायी पालखीचे १८ वे वर्ष आहे यामध्ये नऊ मुक्काम असतात. सुरुवातीच्या काळात केवळ तिघांनी हा पालखी सोहळा सुरु केला होता. आता दिवसेंदिवस पायी पालखी सोहळ्यात सहभागी होणार्या भाविकांची संख्या वाढत आहे. यावर्षी हा पालखी सोहळा दि.१४ डिसेंबर २०२४ रोजी प्रस्थान करणार असून दि.२३ डिसेंबर २०२४ रोजी शिर्डी येथे पोहचणार आहे. या सोहळ्यात सहभागी होण्याकरिता साईभक्तांनी ९४०५०७६५९४ व ९८५००८८६४४ या क्रमांकावर नोंदणी करावी असे आवाहन श्री साई सेवा परिवाराच्या वतीने करण्यात आले आहे.

**नाट्य स्पर्धा** — बीड रसिकांचा नाटकाला उत्स्फूर्त प्रतिसाद

# 'अचानक' नाटकाने उघडला स्पर्धेचा पडदा

बीड/पुण्यभूमी प्रतिनिधी

मानवी मन त्याच्यातल्या भावना, स्वप्न, आकांक्षा, धर्मा-धर्मातील कट्टरतेचे युद्ध आणि जगण्याची उमेद अशा कितीरी भन्नाट काल्पनिक तर कधी वास्तवाच्या गोष्टी लेखक अगदी परखडपणे कागदावर उतरवित असतो. त्या कागदावर उतरलेल्या गोष्टी कधीकधी मानवी मनात खोलवर रुजतात. म्हणूनच अचानक या नाटकाने मानवी जिवनाचे असलेले नाते उलगडून रसिकांना मंत्रमुग्ध केलं. या नाटकाला रसिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

महाराष्ट्र शासनाच्या सांस्कृतिक कार्य संचालनालयाकडून बीड येथील यशवंतराव चव्हाण नाट्यगृह येथे महाराष्ट्र राज्य हौशी मराठी नाटकांची ६३ व्या नाट्य स्पर्धेची प्रथम फेरी सुरु आहे. त्या स्पर्धेमध्ये शनिवार (दि.७) डिसेंबर रोजी यशोदीप बहुउद्देशीय सेवाभावी संस्था, अंबाजोगाई निर्मित, योगेश सोमण लिखित आणि



महेश सबनीस दिग्दर्शित अचानक नाट्य सादर झाले. या नाटकात मिलिंद मुकादम, रुपाली मुकादम, याज्ञसेनी पाठक, संकेत तोरंबेकर, उपेंद्र जोशी यांनी भूमिका साकारल्या होत्या.

या महाराष्ट्र राज्य हौशी मराठी नाट्य स्पर्धेचा आनंद घेण्याचे आवाहन सांस्कृतिक कार्य संचालक बिभीषण चवरे यांनी केले आहे.अशी माहिती बीड केंद्राचे समन्वयक मुकूंद धुताडमल यांनी दिली.

# रयतराज्य संस्थेकडून शालेय साहित्य वाटप



परळी/ पुण्यभूमी प्रतिनिधी

महामानव विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या ६८ व्या महापरिनिर्वाण दिनाच्या निमित्ताने डिघोळ येथील रयत राज्य सेवाभावी संस्थेच्या वतीने शालेय साहित्य वाटप करण्यात आले.

संस्थेच्या वतीने बाबासाहेबांना अभिवादन करताना विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याच वाटप करण्यात आले. परळी येथील आझाद चौकाच्या बाजूला असलेल्या वस्तीवरील गरीब विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य देण्यात आले. तसेच लिटल फ्लावर स्कूल येथील विद्यार्थ्यांना व स्वामी श्रद्धानंद गुरूकुल परळी येथील विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य देऊन बाबासाहेबांना अभिवादन करण्यात आले.यावेळी संस्थेचे अध्यक्ष वैभव खंदारे, पुरुषोत्तम देशमुख सर सुनीलजी प्रधान ,तानाजी आचार्य, गुरुकुलचे आचार्य सत्येंद्रजी आर्य आदी मान्यवर उपस्थित होते.हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी पवन खंदारे, रोहन गायकवाड, अमरदीप खंदारे यांनी प्रयत्न केले.